परमपिता परमात्मा त्रिमूर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव'।

# अमृत कुंभ

वर्ष १८, अंक ६. फेब्रुवारी – मार्च २०२५

## अंतरंग


१. विशेष शुभेच्छा २

२. महाशिवरात्र द्वितीय विशेषांक हाती देताना... ३

३. संपादकीय – खरे व्रत ४

४. बारा ज्योतिर्लिंगांचे आध्यात्मिक रहस्य ६

५. वैद्यनाथ शिव परमात्मा ८

६. शिव मंदिरातील प्रथांचा आध्यात्मिक अर्थ १०

७. शिव भोलेबाबांचा शोध ११

८ देव कुठे आहे ? १२

९. महाशिवरात्रीची कथा आणि रहस्य १५

१०. शिवरात्र सर्वात मोठा सण १८

११. अलौकिक बिल्व वृक्ष २०


## मुखपृष्ठाविषयी

पूर्वी आपल्या संस्कृतीत एक पद्धत होती– वाक्य पूर्ण करण्यासाठी पूर्णविराम दिला की तोंडाने शिव म्हणत किंवा गणितात शून्य वा बिंदूचा वापर केल्यास शिव म्हणत. यामागे एकच प्रयोजन असावे – निराकार शिवाचे रूप ज्योतिर्बिंदू आहे त्याची आठवण काम करताना राहावी. जो बिंदूरूप आहे त्याला मूर्त रूप कसे द्यावे ? याकरिता शिवलिंगांचा आकार कल्पिला गेला. शिव म्हणजे कल्याणकारक. भारतातील प्रत्येक गावात एक तरी शिवमंदिर असतेच तरीही बारा ज्योतिर्लिंग प्रसिद्ध आहेत. शिव पित्याची मधुर आठवण म्हणजे महाशिवरात्रीचा उत्सव. हाच आशय सामावलेला आहे. सर्वांना या महान उत्सवाच्या निमित्ताने शुभेच्छा!

– प्रकाशिका

**फोटो, लेख इत्यादी पाठविण्याचा पत्ता :**
संपादक – अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए–१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व)–४००६०३
फोन : ०२२–२५३२२२०८
E-mail : info@amrutkumbh.com

**वर्गणी पाठविण्याचा पत्ता :**
ब्र. कु. गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ
द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए–१०, वर्षा अपार्टमेंट,
छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी,
ठाणे (पूर्व) – ४००६०३ मोबाईल : ९८२००२३०९२

Printed, published by B.K.Godavari on behalf of Prajapita Brahmakumaris Ishwariya Vishwa Vidyalaya. Printed at Perfect Prints 22, Jyoti Industrial Estate, Nooribaba Dargah Road, Near Makhmali Talao, Thane (west), pin 400601. Published at Prajapita Brahmakumaris Light House, Wagle Estate, Thane (west), Pin - 400604, Maharashtra. Editor : Mr. Sachin Vinayak Upadhye.

**वार्षिक वर्गणी रु. ८५/–, आजीव सभासद वर्गणी रु.१,५००/–, एका अंकाचे रु. १४/–**

E-magazine साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या – www.amrutkumbh.com.



# विशेष शुभेच्छा

**ब्र.कु. संतोष, जॉईंट चीफ ब्रह्माकुमारीज,**
महाराष्ट्र, आंध्र-प्रदेश, तेलंगणा झोन मुख्य संचालिका

आजपावेतो या जगात अनेक क्रांती झाल्या, कधी आर्थिक क्रांती, कधी औद्योगिक क्रांती आणि कधी राजकीय क्रांती. त्यात अनेक राजवटींविरुद्ध आंदोलने, सत्तापालट झाले. पण 'विकाररूपी राजवटीचे आपल्याला उच्चाटन करायचे आहे' असे साक्षात शिवपित्याने सांगितले. एके काळी हिरे-जवाहिऱ्याचा मोठा व्यापार करणाऱ्या 'दादा लेखराजांचा' संपूर्ण वृत्तीपालट झाला. अंगी असलेल्या भक्तीतून वैराग्योदय झाला. त्यांना काही दिव्य साक्षात्कार झाले, त्याद्वारे उलगडा झाला की ज्ञान देणारा प्रत्यक्ष शिव परमेश्वर आहे. शिवपित्याने दादांचे कर्तव्यवाचक नाव ठेवले, 'प्रजापिता ब्रह्मा'. ब्रह्माबाबांनी सर्वांवर पितृवत् प्रेम केले त्यामुळे सर्वजण त्यांना 'बाबा' म्हणू लागले.

ब्रह्माबाबांच्या द्वारे निराकार शिवाने आपले ज्ञान प्रथम प्रकट केले १९३७ मध्ये. तिथून पुढे एका आध्यात्मिक क्रांतीचा जन्म झाला. आजवर स्त्रियांना पददलित समजले जात होते; पण स्त्रियाच अध्यात्माची पायाभरणी करू शकतात, घरा-दाराचा त्याग न करता कुटुंब व्यवस्था सांभाळूनही या मार्गावर चालता येते हे या संस्थेने दाखवून दिले. स्वातंत्र्यपूर्व काळदेखील स्त्रियांसाठी इतका अनुकूल नव्हता अशा वेळी समाजाचा विरोध पत्करून ब्रह्माबाबांनी माता-भगिनींसाठी ब्रह्मचर्याची वाट सुकर केली, प्रसंगी लोक-निंदा, प्रखर विरोध, सामाजिक आंदोलने, कोर्ट-कचेऱ्या या सगळ्यांना तोंड देण्यास मातांना सशक्त केले. यापैकी अनेक घटनांची मी साक्षीदार आहे. संस्थेच्या मुख्य संचालकपदी प्रारंभापासून आजवर स्त्रियाच नियुक्त झाल्या आहेत. अशा प्रकारे चालविण्यात येत असलेली ही एकमेव संस्था असावी. तीस हजाराहून अधिक भगिनी आणि अनेक बांधव आपले समर्पित जीवन जगत आहेत. सुमारे आठ हजार सेवाकेंद्रे राजयोग, मूल्याधारित शिक्षण देण्याचे काम करत आहेत. स्त्री आणि पुरुष दोन्ही संसाररूपी रथाची चाके आहेत म्हणून पवित्र प्रवृत्तीमार्गाची शिकवण संस्थेद्वारे दिली जाते.

आज काळ बदलला. हळूहळू समाजाची मानसिकता बदलली. स्त्रिया स्वतंत्र विचाराने वागू शकत आहेत, स्वतःच्या पायावर उभ्या राहू लागल्या आहेत. दुसरीकडे विज्ञानाची पराकाष्ठा पाहायला मिळत आहे. आज चर्चा आहे, 'कृत्रिम बुद्धीमत्तेची'. अशीही भीती व्यक्त केली जातेय, येणाऱ्या काळात मानव आपली बौद्धिक संपदा घालवून बसेल काय? खरे पाहता आपण द्वापारयुगापासून हळूहळू आपला पुण्यसंचय वापरत गेलो आणि आज असा काळ येऊन ठेपला आहे. आपण अनेक प्रकारचे शिक्षण घेतो; पण विद्यार्थी, डॉक्टर, वकील इतकेच नाही तर मानसोपचार तज्ज्ञदेखील कधी कधी मानसिक समस्यांनी ग्रस्त होताना पाहतो. थोडक्यात काय तर लौकिक शिक्षणासोबत मनावर विजय मिळवण्याचे शिक्षण अति आवश्यक बनत चालले आहे. आज आठवण होते, स्वामी विवेकानंद म्हणत, 'माझ्या हातात शिक्षण व्यवस्था दिली तर मी मुलांना जुजबी अंक ओळख, अक्षर ओळख झाल्यावर मन एकाग्र करण्याचे शिक्षण प्रथम देईन. मग इतर विषय आणि पुढचे शिक्षण'. अशा परिस्थितीत शिवपित्याने स्वतः येऊन दिलेले 'राजयोगाचे' शिक्षण गेली ८८ वर्षे ब्रह्माकुमारी संस्थेमार्फत मोफत दिले जात आहे. शाळा कॉलेजात मूल्य शिक्षण देणे, कारागृहातील बंदी बांधव-भगिनींना राजयोगाचे शिक्षण देणे असे अनेक उपक्रम गेली अनेक वर्षे आम्ही करत आहोत. समाजापर्यंत पोहोचण्याचे एक माध्यम वा प्रयत्न म्हणजे 'अमृत कुंभ' द्वैमासिक. गेली अनेक वर्षे या द्वैमासिकाद्वारे आम्ही समाज प्रबोधन करत आलोय आणि यापुढेही ते असेच चालू राहील ही खात्री आहे.

महाशिवरात्रीनिमित्त पूर्वी एक विशेषांक प्रकाशित केला होता त्याला मिळालेला उदंड प्रतिसाद पाहता अजून एक विशेषांक काढत आहोत. त्यानिमित्त सर्व वाचकांना अनेक शुभेच्छा. आपली आध्यात्मिक वाटचाल उत्तरोत्तर प्रगत होवो हीच शुभकामना.

***



# महाशिवरात्र द्वितीय विशेषांक हाती देताना...

**ब्र.कु. गोदावरी**
प्रकाशिका, अमृतकुंभ, मुलुंड सब-झोन

भक्तिमार्गातही आपण म्हणत होतो 'कर्ता-करविता तो परमेश्वर आहे आपण केवळ निमित्तमात्र आहोत. आज ज्ञानमार्गात इतकी वर्षे चालल्यानंतर जाणवते, पदोपदी शिवपिताच आपली आध्यात्मिक वाटचाल सुखकर करत आहे. या वाटेवर आपल्या हातून काही सेवाही तोच करवून घेत आहे. साधारण चाळीस वर्षांपूर्वी अमृतकुंभची सेवा सुरु झाली. सुरुवातीचे नाव 'अमृत कलश' होते ते बदलून 'अमृत कुंभ' केले गेले. ईश्वरी सेवेकरिता सर्व दादी आणि वरिष्ठ मंडळींचे प्रोत्साहन लाभले त्यामुळेच ही सेवा इतकी वर्षे निर्विघ्नपणे पार पडत आहे.

शिवपित्याचे या सृष्टीवरचे आगमन हीच सर्वात मोठी उपलब्धी आहे या युगाची. लौकिक अर्थाने हे संगणकाचे युग, औद्योगिक क्रांतीचे युग आणि अण्वस्त्रांचे युग मानले जाते मात्र आध्यात्मिक दृष्ट्या हे एक परिवर्तनाचे युग आहे. परिवर्तन मनुष्यात्म्याचे आणि पर्यायाने या सृष्टीचेही. **'देवाच्या सख्यत्वासाठी पडाव्या जीवलगासी तुटी'** असे भक्तीत म्हटले जाते. परमेश्वराचे अवतरण ही एक सत्य घटना आहे. १९३७ साली प्रजापिता ब्रह्माबाबांच्या द्वारे शिवपित्याने आपले ज्ञान प्रथम प्रगट केले. तिथून पुढे हा ज्ञानयज्ञ अव्याहतपणे गेली इतकी वर्षे चालू आहे, नव्हे वृद्धिंगत होत आहे. खरोखरीच 'त्याचा वेलू गगनावरी' गेला हे दिसतंय.

ज्ञान, भक्ती आणि वैराग्य अशा तीन गोष्टींचा उल्लेख आपण नेहमी करतो. भक्तीतून ज्ञानप्राप्ती आणि मग ज्ञानोदय झाल्यावर विषय-विकारांबाबत वैराग्य असा क्रम आहे. आजपर्यंत आपण केलेली व्रत-वैकल्ये फळाला आली आणि कलियुगाच्या अंती शिवपिता या सृष्टीवर भक्तीचे फळ देण्यासाठीच अवतरले. ज्ञान कशास म्हणायचे तर ज्याद्वारे बंधनमुक्ती घडते. 'ज्ञान झालं' असे आपण जेव्हा म्हणतो तेव्हा ते अनुभूतीशी निगडित असते. शिवपित्याने प्रथम आत्मानुभूती आणि मग राजयोगाद्वारे इतर अनुभूती करविल्या. ब्रह्मावत्सांनी राजयोग म्हणजे काय ते जाणले आहे आणि त्याचा नियमित अभ्यास / साधना करत असतात. त्याचसोबत आपले एक आध्यात्मिक कर्तव्य आहे, जे आपण जाणले ते दुसऱ्यास सांगावे.

आताचा काळ आहे 'गीताज्ञान आणि गीताज्ञान दाता दोन्ही आपल्या कर्मातून साकार करण्याचा. एक निराकार शिव आपल्या ध्यानी-मनी हवा. शिवबाबांनी दिलेले ज्ञान सर्वदूर पसरावे आणि या भूतलावरच्या सर्व मनुष्यात्म्यांना पारलौकिक पित्याचा सत्य परिचय मिळावा, हीच शुभ इच्छा आहे. या उद्देशाने हा महाशिवरात्र विशेषांक आपल्या हाती सोपविताना अतिशय आनंद होत आहे. आपणा सर्वांना महाशिवरात्रीच्या मंगल उत्सवाच्या निमित्ताने अनेकानेक शुभेच्छा!

***

## विशेष निवेदन

'कोविड काळात' 'अमृत कुंभ' कदाचित बंद पडले अशी अनेकांनी समजूत करून घेतली असावी. पण आता आपल्या लक्षात आलेच असेल, अमृतकुंभ द्वैमासिक निर्विघ्नपणे चालू आहे. इथून पुढल्या काळातही चालू राहील. नियमित येणाऱ्या विद्यार्थ्यांनी आणि टीचर बहिणींनी अनुभवाचे बोल, मार्गदर्शनपर लेख आणि कविता इत्यादी साहित्य पाठवून दर्जेदार अंकनिर्मितीत हातभार लावावा ही विनंती. त्याचप्रमाणे चढत्या आलेखाने अंकसंख्या वाढवावी हा विशेष आग्रह. वर्षभरात कुठल्याही महिन्यापासून सदस्य होऊ शकता. वार्षिक वर्गणी मात्र रू. ८५/- आणि आजीव सदस्यत्व केवळ रू. १५००/- आहे याची नोंद असावी.

पोस्टाच्या गोंधळामुळे काही वेळेस मासिके मिळत नाहीत अशी तक्रार आमच्याकडे येत राहते. यावर उपाय म्हणून प्रायोगिक तत्त्वावर एक उपाय मांडत आहोत. मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे जिल्ह्यासाठी रजिस्टर पोस्टाचे वाढीव शुल्क ₹१५०/- इतके असेल. वार्षिक मूल्य ₹ ८५/- आणि वाढीव मूल्य अमृतकुंभ कार्यालयात 'मनीऑर्डरने' पाठविता येईल. अन्यथा मोबाईल ९८२००२३०९२ वर संपर्क साधा. याद्वारे अंक मिळावेत हाच प्रयत्न आहे. तुमचा प्रतिसाद मिळावा हीच अपेक्षा – संपादक

# खरे व्रत

संपादकीय ...

अनेकदा आपण काहीतरी निश्चय करतो. नवीन वर्षाच्या निमित्ताने कुणी वजन कमी करणे, व्यायाम करणे, अमुक एक खाण्याचा पदार्थ कमी खाणे किंवा अन्य काही. वाढदिवसाच्या निमित्ताने, एखाद्या प्रिय व्यक्तीच्या देहावसनानंतर किंवा धार्मिक सणाच्या निमित्ताने काही निश्चय करणे ही प्रथा काही नवीन नाही. अशाच एका निश्चयाबाबत आज विचार करूया. त्यासाठी सणाची पूर्वपिठिका ध्यानात घेऊया. एखादा निश्चय का करायचा? 'निश्चयाचे बळ तुका म्हणे तेचि फळ' याचा अर्थ एखाद्या निश्चयानुसार वागणे म्हणजे जीवनाला काही आकार देणे. जसे मडक्याला आकार देताना कुंभार आपल्या हाताचा आधार देतो. त्या हातांच्या मर्यादेत तो मातीचा गोळा कुंभाराच्या मनातला आकार घेतो. म्हणजे आकार घ्यायचा तर काही मर्यादा घालून घ्याव्या लागतात. मर्यादा नसतील तर सुनिश्चित आकार येत नाही. आजकालच्या पिढीला कुठलेही बंधन नकोय. बंधन नसावे; पण मर्यादा नक्कीच असाव्या. तरुण पिढीसाठी 'झटपट यशाचा' जमाना आहे. लवकर यश हवे असते. अनेक तास नेटमध्ये सराव केल्यामुळे सचिन तेंडुलकर इतका मोठा फलंदाज झाला. म्हणजेच काहीतरी निश्चय केला आणि त्यानुसार कृती केली तरच ध्येयप्राप्ती घडू शकते.

मी अमुक एक गोष्ट आजपासून करणारच हे ठरविणे म्हणजे आध्यात्मिक भाषेत व्रत घेणे. सोप्या भाषेत 'व्रत'म्हणजे मनाशी काही चांगली गोष्ट ठरविणे आणि काही पथ्ये कृतीत पाळणे. उदाहरणार्थ 'मी आजपासून तीन महिने गोड खाणार नाही' हे मनाशी ठरवायला लागते. त्यानंतर असे प्रलोभनाचे अनेक प्रसंग समोर आले, कितीही चांगली मिठाई समोर आली तरी ती न खाणे हे झाले पथ्य. आताचा काळ प्रचंड गोंधळाचा आहे. माहितीचा ओघ सर्व बाजूने वाहत आहे. ज्यांना आपले करियर करायचे आहे त्यांच्या समोर पर्याय पुष्कळ आहेत आणि त्यामुळेच कधी कधी गोंधळ उडू शकतो. विशेष करून तरुण पिढीसाठी नक्की कुठला पर्याय निवडावा त्याबाबत मार्गदर्शन करताना पालकही कधी कधी गोंधळतात. अशा वेळेस तरुण पिढी काय किंवा त्यांचे पालक काय, व्यावसायिक, नोकरदार, साधक सर्वांसाठीच काही नियम आणि त्यासाठी काही प्रयोग करणे आवश्यक आहे.

१. 'एखादी गोष्ट अशक्य आहे' असं मानून हातपाय गाळून बसण्यात अर्थ नाही. **'नथिंग इज इम्पॉसिबल इन धिस वर्ल्ड'** असे नेपोलियन म्हणत असे. ज्या तरुणांना काहीतरी मिळवायचे आहे; पण ध्येयप्राप्तीत स्वतःच्याच विचारांची बाधा होते अशा मंडळींनी खालील प्रयत्न करून पाहावा.

अ) नकारात्मक विचार व्यक्त करणाऱ्या व्यक्तींपासून दूर जावे किंवा त्यांची संगत काही काळ कमी करणे. अशा नकारात्मक विचारांच्या व्यक्तींबद्दल आपण घृणाही बाळगायची नाही, तर विचार करायचा 'ही व्यक्ती कमकुवत आहे त्यामुळे असे विचार करते. नाहीतर आपणही नकारघंटा वापरणाऱ्यांपैकी एक होऊन जाऊ.

आ) काही सकस वाचन करण्याची सवय लावून घ्यायची. उदाहरणार्थ जे जीवनात संघर्ष करून त्यातून तावून-सुलाखून बाहेर आलेत अशा माणसांच्या पुस्तकांचे वाचन, त्यांच्याविषयीची माहिती गोळा करणे, त्यात जाणीवपूर्वक रस घेणे. उदाहरणार्थ **'लुई हे'** यांचे **'यू कॅन हील युवर लाईफ'** वा इतर काहीही. अशा वाचनातून ऊर्जा मिळते. असे काही उपाय ज्याने-त्याने ठरवावे.

२. **वेळेचे भान** - डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत 'फुकट घालवायला माझ्याकडे 'वेळ आणि पैसा' दोन्ही नाही.' कंटाळवाण्या सभेत नाईलाजास्तव बसावे लागले तर ते जवळ ठेवलेले पुस्तक काढून वाचत असत. वेळ फुकट कुठे जातो? आजच्या काळात 'अपडेट' राहण्याच्या चक्रात सोशल मीडियाच्या मागे

बहुतेकांचा वेळ फुकट जातो. कुठलेही माध्यम वाईट नसते. त्याचा वापर आपण कसा करतो यावर सगळं गणित अवलंबून आहे. टाइम मॅनेजमेंटचे अनेक कोर्स उपलब्ध आहेत. ते शिकून त्यानुसार आपला वेळ आपल्या नियंत्रणात आणता येईल.

३. **फाफट पसाऱ्यापासून लांब** – 'काय, का कसे' यासारख्या प्रश्नाचा उपयोग शास्त्रज्ञांप्रमाणे केला तर आपणही काही संशोधन करू शकतो. नाही तर केवळ व्यर्थ विचारांना जन्म देण्यापलीकडे काही घडत नाही. हल्लीच्या भाषेत ज्याला 'गॉसिप' म्हटले जाते त्यात वेळ कसा जातो ते कळतही नाही. अनेकदा फेसबुकवर एखादा, काही कमेंट टाकतो, त्याला इतर लोक उत्तरे देतात आणि ती शृंखला सुरूच राहते, त्यात आपण ओढले जातो. अशा गोष्टी आपल्यासाठी नाहीत हा निश्चय करणे महत्त्वाचे आहे.

४. **थोडासा अहंकारत्याग** – 'मीच बरोबर आहे, मलाही काही कळतं, मीही बरेच पावसाळे पहिले आहेत' अशा प्रकारची विचारधारा थोड्या काळासाठी बाजूला ठेवण्याचे व्रत घेऊन पहा. अनेकदा आपल्या लक्षात येतं, इतकं ताणून ठेवायची गरज नव्हती; पण ते उशिरा सुचलेले शहाणपण असते. ठरवून केले तर का नाही घडणार? पहिला मुद्दा – अशक्य आहे हा विचार टाकून द्यायचा आहे. या लेखातील पहिल्या मुद्द्याचा इथे वापर करायचा आहे. एखाद्या परिस्थितीत आपला मुद्दा आपण थोडासा मागे ठेवला, एक क्षणभर विश्रांती विचारांना देऊन मग प्रतिक्रिया द्यायची असा प्रयोग करून पहा. नक्की यश मिळेल.

५. **काही इतर गोष्टींचा त्याग** – आपल्यात 'एक लहान मूल' जन्मापासून मृत्यूपर्यंत दडलेलं असतं असं मानसशास्त्र सांगतं. आपण ते अनुभवतो देखील. पण कधी कधी ते मूल अवखळपणा करून नको तेव्हा डोकं वर काढतं आणि मग आपण ज्याला खुशाल चेंडूपणा म्हणतो ना तो स्वभावात येतो. म्हणजे तणावरहित असणे चांगले; पण निष्काळजी असून उपयोग नाही. मनाला रबरबँडप्रमाणे ताणून पहा; पण तुटेल इतकेही ताणायचे नाही आणि ते ढीले पडेल इतकेही सोडून द्यायचे नाही. हीच तर जीवनातील कसरत आहे. आळस वा बहाणा या दोन दुर्गुणांचा असाच प्रभाव आपल्यावर पडतो. समजा व्यायाम नियमित करायचा हा नियम केला. तर कधी पाहुणे आले, कधी कंटाळा आला असे बहाणे आपणच सोयीस्कररीत्या वापरतो. हे न करणे असे एक व्रत घेऊन पहा. क्षेत्र कुठलेही असो.

अशा नियमांची वा व्रतांची यादी वाढविता येईल. उदाहरणादाखल काही नुमने वर दिले आहेत. हे सगळे आपल्याला माहीत नाही / नवीन आहे का? अजिबातच नाही. प्रश्न असा आहे, केलेला निश्चय ढळतो. समजतं; पण हातून घडत नाही. समर्थ रामदासांनी दासबोधात एक छान उल्लेख केला आहे तो पाहू अन् पुढे जाऊ

अखण्ड भ्रांती पडे<br>
केला निश्चय विघडे<br>
अत्यंत निद्रा आवडे<br>
तो तमोगुण (दासबोध दशक २, समास ६, ओवी ८)

हा तमोगुण दूर कसा करायचा हाच यक्षप्रश्न आहे. मनाची ताकद कमी पडते म्हणून 'केला निश्चय विघडे' असे होते. तमोप्रधान अवस्था म्हणजेच कलियुगी रात्र. दुसऱ्या अर्थाने तमोमय स्थिती म्हणजे अज्ञानरूपी अंधार. आज विज्ञानातील अनेक गोष्टी प्रगत झाल्या आहेत. त्याविषयीची माहिती दिवसेंदिवस प्रगत होत आहे. जगात अनेक धर्मग्रंथ आहेत. आजवर अनेक संत-महात्मे, धर्मात्मे होऊन गेले. इतके सगळे असूनही मानवाला स्वतःच्या मनावर राज्य प्राप्त करता आले आहे का? जसे अंधारात आपण चाचपडतो तसे आजही मनावरच्या स्वामित्वाबाबत काहीसे आहे हे खेदाने म्हणावे लागते. यावर उपाय काय?

सृष्टीच्या अशा अवस्थेमध्ये स्वतः शिवाचे अवतरण झाले आहे ही सत्य घटना आहे. शिव अवतरणाची वेळ महाशिवरात्रीच्या रूपात साजरी केली जाते. रूढार्थाने वर्षातून एकदा येणारा हा सण नसून ५००० वर्षांच्या कालखंडातील एकमेव सर्वोच्च घटना आहे. शिव म्हणजे 'कल्याणकारी'. त्याचे खरे रूप निराकार आहे; पण त्याच्याविषयी भक्तिभाव प्रकट करण्याचे स्थूल माध्यम म्हणून शिवलिंगाच्या विशिष्ट आकाराचा जन्म झाला. असा शिवपिता येऊन मनाच्या एकाग्रतेसाठी 'प्राचीन राजयोग' शिकवितो. स्वतःला देह न समजता एक चैतन्य आत्मा ज्योतीबिंदू शक्ती समजणे ही राजयोगाची प्रथम पायरी आहे.

(पृष्ठ क्र.९ वर)

# बारा ज्योतिर्लिंगांचे आध्यात्मिक रहस्य

**ब्र.कु. पुष्पा, नाशिक**

**सौराष्ट्रे सोमनाथं च श्रीशैले मल्लिकार्जुनम्।**
**उज्जयिन्यां महाकालमोङ्कारममलेश्वरम्।।**
**वैद्यनाथम् चिताभूमो च डाकिन्यां भीमशङ्करम्।**
**सेतुबन्धे तु रामेशं नागेशं दारुकावने।।**
**वाराणस्यां तु विश्वेशं त्र्यम्बकं गौतमीतटे।**
**हिमालये तु केदारं घुश्मेशं च शिवालये।।**

भारतातील १२ ज्योतिर्लिंगांची नावे असलेला हा श्लोक अनेकांना मुखोद्गत असेल. भारतात प्रत्येक लहान-मोठ्या गाव व शहरात आणि तसेच जगभरात असलेल्या हजारो शिवमंदिरांतही विशेष बारा शिवलिंग 'ज्योतिर्लिंग' म्हणून प्रसिद्ध आहेत. ज्योतिर्लिंग म्हणजे ज्योति अर्थात 'प्रकाशस्वरूप चिन्ह' (लिंग अर्थात चिन्ह). पिढ्यानुपिढ्या अत्यंत श्रद्धेने आणि भक्तिभावाने या शिवलिंगांची पूजा केली जाते. ज्योतिर्लिंग हे निराकार परमात्म्याचे प्रतीक आहे. या १२ ज्योतिर्लिंगांची विशिष्ट नावे का आहेत? त्यांच्याशी निगडित काय कथा आहेत? आणि त्यामागे काही विशेष रहस्य आहे का हे या शिवरात्रीच्या निमित्ताने जाणून घेऊ या.

**सोमनाथ :** गुजराथेतील सौराष्ट्र येथे समुद्राजवळ प्राचीन सोमनाथ ज्योतिर्लिंग आहे. सोम म्हणजे चंद्र. असे म्हटले जाते, की येथे ज्योतिर्मय परमात्म्याकडून चंद्राला तेज प्राप्त झाले. ज्ञानसूर्य परमात्म्याकडून प्राप्त होणाऱ्या ज्ञानाच्या प्रकाशाने अज्ञानरूपी अंधकार दूर होतो. सोम या शब्दाचा दुसरा अर्थ आहे अमृत. अज्ञानाने ग्रासलेल्या, दुर्बल झालेल्या जनसामान्यांना पुन्हा बलशाली करणारे परमात्म ज्ञान हे अमृतासमान आहे.

**मल्लिकार्जुन:** आंध्र प्रदेशातील श्रीशैलम् या पर्वतावर स्थित मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग मंदिर. मल्लिका या शब्दाचा एक अर्थ आहे शुभ्र रंगाचे अति सुगंधित पुष्प. ज्योतिर्लिंग रूपात पूजिले जाणाऱ्या सच्चिदानंद परमात्मा शिवाचे अति सुंदर ज्योतिबिंदू स्वरूप आहे. सत्यम शिवम सुंदरम आहे. हेच दिव्य आकर्षक स्वरूप श्री क्षेत्र मल्लिकार्जुन म्हणून प्रसिद्ध आहे.

**महाकालेश्वर :** मध्य प्रदेशातील ऐतिहासिक उज्जैन नगरीमध्ये स्थित आहे महाकालेश्वर ज्योतिर्लिंग. परमात्मा शिवाला 'महाकाल' संबोधले जाते. परमात्मा जन्म-मृत्यूच्या चक्रात येत नाही. या मृत्युलोकात प्रत्येक मनुष्याला योग्य वेळी नश्वर देहाचा त्याग करावा लागतो. परंतु शिव परमात्म्याचे अजर अमर अविनाशी सत्य स्वरूप जाणल्यानंतर मनुष्य अकाली मृत्यूच्या भयातून मुक्त होतो. म्हणून महाकालेश्वर हे ज्योतिबिंदू शिव परमात्म्याद्वारे मनुष्याला प्राप्त होणाऱ्या आत्मिक ज्ञानाचे प्रतीक आहे.

**ओंकारेश्वर :** ॐचा अर्थ आहे- मी ज्योतिर्बिंदु आत्मा आहे. सर्व आत्म्यांचा पिता परमात्मा शिव हा देखील अखंड ज्योतिस्वरूप आहे. मात्र ज्योतिर्लिंगाप्रमाणे मोठा आकार नसून तो बिंदुस्वरूप आहे. केवळ बिंदूची पूजा करण्यास कठीण असल्याकारणाने शिवलिंगाच्या रूपात त्याचे पूजन केले जाते. कलियुगाच्या या अंतिम चरणामध्ये अवतरित होऊन परमात्मा 'ॐ' अर्थात आत्मिक रूपाचे सत्य ज्ञान मनुष्यास देतो. याचेच स्मृतिचिन्ह म्हणजे ओंकारेश्वर मंदिर आहे. तिथेच स्थित असलेले अमलेश्वर हे मनुष्य आत्म्यांना निर्मल (पवित्र) करणाऱ्या परमात्मा शिवाचे मंदिर आहे. निर्मल अर्थात पापविरहित. निराकार परमात्म्याशी मन आणि बुद्धीच्या एकाग्रतेद्वारे जोडले गेल्यास पापक्षालन होते.

**बैद्यनाथ (वैजनाथ) :** महाराष्ट्रात परळी जवळ स्थित असलेले प्राचीन ज्योतिर्लिंग बैद्यनाथ. एखाद्या असाध्य रोगाने ग्रस्त व्यक्तीवर इलाज करताना ज्यावेळी सारे उपाय हरतात; त्यावेळी स्वाभाविकच वैद्यांचा वैद्य परमात्म्याचे स्मरण होते. रोगाचे मूळ कारण हे वास्तविक पूर्वकर्माचे फळ असून या दुःखातून, या पीडेतून खऱ्या अर्थाने मुक्ती एक परमात्माच देऊ शकतो. परमात्मा शिव अवतरित होऊन ज्यावेळी ज्ञान आणि सहज राजयोगाचा उपाय सांगतात, त्यावेळी केवळ शारीरिक नव्हे, तर आत्म्याच्या अंतरंगात लपलेल्या काम-क्रोधादि विषय-विकार रुपी विषापासून मुक्ती तसेच जीवनमुक्ती प्राप्त होते. म्हणूनच शिवाला अमृतेश्वर अथवा नीळकंठेश्वर असेही संबोधले जाते.

**भीमाशंकर :** शास्त्रात असलेल्या वर्णनानुसार अशी कथा आहे, की भीमाशंकर या स्थानावर त्रिपुरासुर नामक राक्षसाला परमात्मा शिवाने आपल्या शक्तींनी पराभूत केले. तेव्हापासून हे स्थान दुष्ट शक्तींवरील विजयाचे प्रतीक ठरले. हे स्थान आपल्याला सर्वशक्तिमान परमात्म्याची स्मृती करून देते. कलियुगाच्या अंतिम चरणांत ज्यावेळी मनुष्यात आसुरी प्रवृत्ती प्रबळ झाल्या आहेत, अशा धर्मग्लानीच्या युगात परमात्मा शिवाचे दिव्य अवतरण होते. त्याने दिलेल्या दिव्य ज्ञानामुळे मनुष्याची आत्मिक शक्ती पुन्हा जागृत होऊन पवित्रता, सुख, शांती सारख्या दिव्य गुणांची पुन्हा प्राप्ती होते. याच घटनेचे प्रतीकात्मक रूप ही असुर-वधाची कथा प्रसिद्ध आहे.

**रामेश्वर :** तामिळनाडूमध्ये समुद्र तटाजवळ प्रभू श्रीरामाने रामेश्वर ज्योतिर्लिंगाची प्रतिष्ठापना केली असे मानले जाते. असे म्हणतात, की रावणावर विजय प्राप्त करण्यासाठी युद्धापूर्वी श्रीरामाने परमात्मा शिवाचे स्मरण करून त्यांच्याकडून वरदान प्राप्त करून घेतले. यावरून हे सिद्ध होते, की शिव परमात्मा केवळ साधारण मनुष्यांचेच नव्हे, तर देवतांचेही पूज्य परमपिता आहेत. अर्थात्, कोणतीही शरीरधारी देवता, परमात्मा नसून, परमात्मा हा निराकार ज्योतिबिंदु आहे. हे ज्योतिर्लिंग सर्व आत्म्यांच्या ठायी परमात्म्याप्रती असलेल्या अगाध भक्तीचे प्रतीक आहे.

**नागेश्वर / नागनाथ :** महाराष्ट्रात स्थित असलेल्या या प्राचीन मंदिराचा उल्लेख शिवपुराणात देखील आढळतो. बहुतेक सर्वच शिवमंदिरांमध्ये शिवलिंगावर पंचमुखी नाग पाहावयास मिळतो. वास्तविक पाहता सर्प हा मानवी जीवनात विषाप्रमाणे पसरलेल्या पांच विकारांचे प्रतीक आहे. परमधाम निवासी शिव परमात्मा आपल्याला शक्ती प्रदान करून या विकारांवर संपूर्ण विजय प्राप्त करवतात. म्हणून त्यांना नागेश्वर / नागनाथ असे संबोधले आहे.

**विश्वेश्वर :** इतिहासप्रसिद्ध वाराणसी नगरात गंगातटावर स्थित आहे श्री काशी विश्वनाथ मंदिर. त्रिमूर्ती शिव परमात्मा अखिल विश्वातल्या सर्व मनुष्य आत्म्यांचा पारलौकिक पिता आहे. सर्वधर्मीय लोक परमात्म्याला निराकार मानतात. पाच तत्वांपलीकडे दिव्य प्रकाश लोकात- परमधामात निवास करणाऱ्या शिव परमात्म्याच्या विश्वकल्याणकारी कर्तव्यांचे प्रतीक आहे श्री काशी विश्वेश्वर ज्योतिर्लिंग.

**त्र्यंबकेश्वर :** नाशिकजवळ गोदावरी नदीच्या किनाऱ्यावरील प्राचीन देवस्थान त्र्यंबकेश्वर. त्र्यंबक अथवा त्रिंबक म्हणजे तिसरा नेत्र. चर्मचक्षुंद्वारे ज्या गोष्टी पाहता येत नाहीत, त्या दिव्य बुद्धीच्या नेत्रांनी पाहणे शक्य आहे. शिव परमात्म्याचे या सृष्टीवर दिव्य अवतरण होऊन त्याच्या दिव्य ज्ञानाच्या प्राप्तीने मनुष्याची दिव्य बुद्धी विकसित होऊ लागते अर्थात् त्याला दिव्य बुद्धिरूपी तिसरा नेत्र प्राप्त होतो. ही प्राप्ती करवणाऱ्या परमात्म्याची स्मृती म्हणजे त्र्यंबकेश्वर. याखेरीज, सृष्टीची उत्पत्ती, स्थिती आणि लय (स्थापना, पालना आणि विनाश) या परमात्मा शिवाच्या तीन कर्तव्यांचेही प्रतीक म्हणजे त्र्यंबकेश्वर.

**केदारेश्वर :** बर्फाच्छादित हिमशिखरांमध्ये वसलेले अतिप्राचीन केदारनाथ मंदिर. १२ ज्योतिर्लिंगांतही या मंदिराचे महत्व विशेष आहे. अत्युच्च शिखरांवर स्थित असे हे मंदिर परमात्मा शिवाचे निवासस्थान अर्थात् पाच तत्वांच्या पलीकडे असलेल्या ब्रह्मलोक अर्थात् परमधामाचे स्मरण करून देते. यामागचे आणखी एक रहस्य म्हणजे ज्याप्रकारे हिमालयात प्रवास करत चढून गेल्यानंतरच केदारनाथाचे दर्शन होते, त्याचप्रकारे, उच्च श्रेष्ठ संकल्प आणि मनाची शांत आणि शीतल स्थिती असेल तरच सर्वश्रेष्ठ परमात्म्याचे मंगल मिलन होऊ शकते.

**घृष्णेश्वर :** एका प्रचलित कथेनुसार, पार्वतीने कुंकुम, केशर आणि शिवालयातील पवित्र जल हातात घेऊन घर्षण केले, त्या घर्षणातून या ज्योतिर्लिंगाची निर्मिती झाली आणि त्यातून दिव्य ज्योतिस्वरूप प्रकट झाले. ज्ञानसागर परमात्म्याचे ज्ञान प्राप्त झाल्यावर जर त्या ज्ञानाचे मनन - चिंतन केले, तर या ज्ञान-घर्षणातून मनुष्याच्या बुद्धिचे तेज वाढू लागते. जड़ वस्तु-विकारांमध्ये रममाण होऊन मलिन झालेली बुद्धी दिव्य होऊ लागते. हा या प्रतीकात्मक कथेमागचा खरा अर्थ आहे.

या बारा ज्योतिर्लिंगाचे स्मरण सकाळ संध्याकाळ अर्थात सर्वदा करावे, त्यांच्या स्मरणाने अनेक जन्मांतरीची पापकर्म नष्ट होतात, तसेच या जन्मातही पापकर्मांपासून परावृत्त होण्याची शक्ती मिळते.

परमात्मा शिवाची १२ ज्योतिर्लिंग या महिन्यांत स्मरण करण्याचेही विशेष महत्त्व आहे. उत्तर भारतात फाल्गुन महिन्यात महाशिवरात्री भक्तिभावाने साजरी केली जाते.

(पृष्ठ क्र.१७ वर)

# वैद्यनाथ शिव परमात्मा

**ब्र.कु. वैभव, अक्कलकोट**

महाराष्ट्रातील एक तीर्थस्थान परळी वैजनाथ किंवा त्याचेच दुसरे नाव वैद्यनाथ. बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक. शिवाच्या अनेक नावांपैकी एक नाव वैजनाथ. तसेच गूढ कथांशी जोडलेले हे नाव आणि भक्तिमार्गातील त्याचे अलौकिक महत्त्व! याबाबत या लेखाद्वारे काही माहिती घेऊया.

एका कथेनुसार देव-दानवांच्या समुद्र मंथनातून चौदा रत्ने बाहेर आली. त्यातील एक होते धन्वंतरी. धन्वंतरी हा देव आयुर्वेदाचा किंवा औषधशास्त्राचा जनक मानला जातो. काही ठिकाणी देवांचा आरोग्यकर्ता असेही म्हटले जाते. थोडक्यात काय तर चांगल्या आरोग्याचा संबंध धन्वंतरीशी जोडला आहे. कथेनुसार, समुद्र मंथनातून अमृत आणि धन्वंतरी बाहेर पडले ते प्राप्त करण्याकरिता असुरही धावले. त्यांच्यापासून धन्वंतरी लपवून ठेवण्याकरिता शिवलिंगाचा आधार घेण्यात आला. धन्वंतरीस शिवलिंगात गुप्तपणे ठेवले गेले. त्यामुळे शिवलिंगास स्पर्श केल्यावर आपले आजार नष्ट होतात असा एक समज दृढ झाला.

अजून एक कथा अशीच रोचक आहे. मार्तंड ऋषींबाबत. ते अल्पायुषी असतील असे भाकीत त्यांच्या आई-वडिलांपाशी कुणीतरी करून ठेवले होते. आई-वडिलांनी हे सांगितल्यावर मार्तंड ऋषींचे मन खट्टू झाले आणि ते ईशप्राप्तीच्या प्रयत्नात मग्न झाले. ईश्वर शोधार्थ रानोमाळ भटकताना त्यांना नारदमुनी भेटले. त्यांच्या सांगण्यानुसार शिवाची घोर उपासना केल्यावर शिव प्रसन्न झाले आणि मार्तंड ऋषींना अमरत्व प्राप्त झाले. थोडक्यात काय तर शिवलिंगाच्या दर्शनाने, शिवआराधनेने आजार दूर पळतात, मृत्यूचे भय निघून जाते अशी मान्यता आहे.

आजच्या काळात बहुतेक सर्वच आजार हे 'मनोकायिक' म्हणजे 'सायकोसोमॅटीक' आहेत असे म्हटले जाते. मन आणि शरीर यांचा अन्योन्य संबंध आहे आणि त्यातूनच अनेक आजार उद्भवतात असे अनेक तज्ज्ञांचे मत आहे. प्रसिद्ध डॉ. बी. एम. हेगडे म्हणतात, आपल्या श्वसनमार्गात सर्दीचे जंतू कायमच असतात; पण जेव्हा आपल्याला प्रकर्षाने खिन्न वाटते, काही कारणाने आपले मन निराश होते तेव्हा सर्दी आपले डोके वर काढते. म्हणजेच काय, अवतीभोवती त्रासदायक जीव-जंतू आहेत मात्र त्यांचा मारा कधी होऊ शकतो? जेव्हा आपली मानसिक स्थिती दुबळी होते तेव्हा. अशाच प्रकारे संधिवात, थायरॉईड ग्रंथींबाबतचे आजार, इतकेच काय कर्करोगासारखे मोठे आजारही मनाशी जोडले आहेत असे 'लुई हे' नावाच्या अमेरिकेतील प्रसिद्ध लेखिकेचे म्हणणे आहे. त्यांनी अनेक पुस्तकातून या विषयावर विपुल लेखन केले आहे. इतकेच नव्हे तर आजार झाल्यावर कशा प्रकारचे विचार करा जेणेकरून तुमच्या औषधोपचार आणि पथ्य-पाण्यास मदत मिळेल याबाबतही त्या भाष्य करतात.

आज आपण म्हणतो मानव प्रगत झाला आहे. त्याने चंद्रावर, मंगळावर पाऊल ठेवले. मात्र वाढत्या साधन-सुविधांसोबत आपले मानसिक स्वास्थ्य मात्र डळमळीत होत चालले आहे. विशेषकरून शहरांमधील मानवाची जीवनशैली, दगदग, प्रदूषण, उद्योग-व्यवसायातील ताण-तणाव या सगळ्याचा एकत्रित परिणाम म्हणजे निरनिराळे आजार. यातल्या बहुसंख्य आजारांचा मनाच्या आरोग्याशी संबंध आहे. मधुमेह, उच्च रक्तदाब हे ताण-तणावाचे फलित आहे असे डॉक्टर मान्यच करतात. साधे लठ्ठपणाचे उदाहरण घेऊया. अनेकजण लठ्ठ का होतात तर जिभेवर नियंत्रण नाही. जिभेवर नियंत्रण ठेवणारे इंद्रिय कोणते? मन! म्हणजेच एक प्रकारे तो आजारही मनोकायिक म्हणावा लागेल. आध्यात्मिक दृष्ट्या असे म्हटले जाते, सर्व आजारांचे मूळ आहे पाच विकार. काम-क्रोध-लोभ-मोह-अहंकार. या विकारांच्या प्रभावाखाली मनुष्यात्मा येतो आणि मग त्याचे दुष्परिणाम शरीरावरही होतात. म्हणजे एक प्रकारे मन-बुद्धीला प्रथम हे आजार जडतात आणि मग त्याचे प्रकट रूप शारीरिक आजारात दिसून येते.

एका पाहणीनुसार पौगंडावस्थेतील (चौदा वर्षांच्या आसपासची मुले) मुलांमध्ये साधारण ५०% मुले मनोकायिक आजारांचे बळी ठरत आहेत. हेच प्रमाण

वयाच्या एकविशीत पोहोचलेल्या अनेक तरुण-तरुणींत ७५% इतके वाढताना दिसून आले आहे. इतर काही पाहणीनुसार स्त्रियांत मनोकायिक आजारांचे प्रमाण साठ टक्क्याच्या वर गेले आहे. गुगलवरील ही माहिती खरी मानली तर या प्रकारच्या समस्या चिंताजनक आहेत. मन हे अभौतिक आहे त्याला गोळ्या-औषधे कशी दुरुस्त करू शकतील. स्थूल रूपातील औषधांचा सायकॉलॉजिकल परिणाम होऊ शकतो; पण सूक्ष्म स्तरावर कसा काय परिणाम होऊ शकेल? अनेक देशातील लोकांमध्ये डिप्रेशन ही एक समस्या मोठी होत चालली आहे. अशा वेळेस ध्यान-धारणेसारखे काही उपाय सहज आणि कमी खर्चात करता येण्यासारखे आहेत. नुसते श्वसनावर ध्यान केंद्रित केले तरी हळूहळू उच्च रक्तदाब कमी व्हायला मदत होते. इतकेच नव्हे तर, फिशटँकमधील मासे रोज काही काळ बघत राहिले तरी ताण कमी होतो असे संशोधन सांगते. हे देखील एक प्रकारचे ध्यानच झाले ना!

शिवपित्याने येऊन दिलेल्या ज्ञानानुसार सर्व विकारांचे मूळ आहे स्वतःला देह समजणे. दैहिक भावनेतूनच काम-क्रोधादि अन्य विकार जन्माला येतात. त्यामुळे आपण एक चैतन्य आत्मा आहोत असे समजणे आणि हळूहळू देहाविषयीचे भान कमी करणे ही राजयोगाची पहिली पायरी आहे. या अभ्यासाने आपोआपच श्वसनाचा वेग कमी होतो असा अनुभव आहे. त्याचप्रमाणे विचारांचा वेगही कमी होतो. जेव्हा विचारांचा वेग कमी होतो तेव्हा प्रत्येक विचारामागे धावणारी ऊर्जा तुलनेने वाढते. परिणामी आपल्या विचारांची / संकल्पांची सिद्धीच प्राप्त होते. देहभानापासून मुक्त होण्याच्या अभ्यासातील दुसरी पायरी आहे, निराकार शिवाशी आपले मन-बुद्धी जोडणे. शिव परमेश्वर हा ऊर्जेचा, शक्तींचा अक्षय सागर आहे. त्याच्यावर ध्यान केंद्रित करणे म्हणजे जणू त्याला स्पर्श करणे. हेच ते शिवलिंगाला स्थूल रूपात स्पर्श करून आजार दूर करणे नव्हे का? राजयोगाच्या या अभ्यासाने मनोविकारांवर विजय मिळवण्याचा मार्ग सहज होत जातो. आत्मभानाच्या अभ्यासाने मृत्यूचे भयही कमी होऊ लागते. **नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः** (भगवद्गीता अ. २, श्लोक २३), आपण अनेक वेळा हा श्लोक म्हणतो मात्र त्याच्या अर्थाच्या अभ्यासात किती रममाण होतो? शिवपिता येऊन नेमके हेच सांगत आहेत. अशा अभ्यासानेच आत्म्यास जडलेले आजार दूर पळतील. आपण आध्यात्मिक दृष्ट्या निरोगी होऊ. हा अर्थ समजून घेतला तर त्या परमप्रिय शिवाचे 'वैद्यनाथ नाव किती सार्थ ठरते नाही का!'

***

---

(पृष्ठ क्र.५ वरुन)

त्यानंतर निराकारावर आपले मन केंद्रित करणे ही दुसरी पायरी. अशा अभ्यासाने मनरूपी घोडा काबूत आणता येऊ लागतो. राजयोगाच्या अभ्यासाने सहनशक्ती, पारखण्याची शक्ती अशा विविध शक्तींचा आपल्यात संचार होऊ लागतो हा लेखकाचा वैयक्तिक अनुभव आहे.

अशा प्रकारे शिवाची आठवण करणे म्हणजे राजयोग साधणे होय. आपलं मन मोठं विचित्र आहे. आपल्याला साहजिकच आठवण कुणाची येते? ज्याच्यावर प्रेम जडले आहे, नाते-संबंध आहे, ज्याच्या गुणवैशिष्ट्यांचे गारुड मनावर आहे अशांची आठवण येते. अन्यथा ज्यांच्याकडून आपल्याला काही प्राप्त झाले आहे, उदाहरणार्थ चांगले शिक्षक आयुष्यभर आठवतात. त्यासोबत ज्यांच्याशी कर्मांचा हिशेब बांधला आहे अशांची आठवण येते. शिवपित्याची आठवण यावी याकरिता त्याचा सत्य परिचय आणि मग त्यातून नाते-संबंध जोडणे महत्त्वाचे आहे. त्यावाचून प्रेमाचा कढ येणार नाही. प्रेमभराने त्याची आठवण हाच योग आहे. याद्वारेच **'जळोन गेले कामक्रोध'** ही अवस्था प्राप्त होऊ शकते. एके काळी हिरे जवाहिऱ्याचा व्यापार करणाऱ्या 'दादा लेखराजांच्या' देहाचा आधार घेऊन शिवपित्याने आपले ज्ञान प्रकट केले. दादांचे कर्तव्यवाचक नाव 'प्रजापिता ब्रह्मा' ठेवले. ब्रह्माबाबांच्या द्वारे राजयोग शिकविला. तो शिकण्यासाठी जवळच्या राजयोग केंद्रावर जाऊन रीतसर प्रशिक्षण घ्या. महाशिवरात्रीचा सण एक निमित्त आहे, काहीतरी नवीन शिकण्याकरिता.

महाशिवरात्रीच्या अनेकानेक शुभेच्छा देऊन इथेच थांबतो.

***

# शिव मंदिरातील प्रथांचा आध्यात्मिक अर्थ

**ब्र.कु. बाळू, सोलापूर**

शिवलिंगाच्या पूजेबाबत काही निरीक्षणे आणि त्यामागचे आध्यात्मिक रहस्य काय असावे असा प्रश्न अनेकांच्या मनी यापूर्वी डोकावला असेल.

**शिवलिंगाकार**

या प्रतिमेचे मूलतः दोन भाग मानले तर त्यातील एक उभा भाग अंगुष्ठाकार आहे आणि दुसरा त्याचा पाया गोलाकार आहे. वेदांच्या काळात किंवा त्याही पूर्वीच्या काळी अनेकांना ईश्वराच्या निराकार रूपाचा किंवा ज्योतिस्वरूपाचा साक्षात्कार झाला. काही ऋषीमुनींना ध्यानावस्थेत प्रकाशाचा पुंज/पुंजका अंगठ्याच्या आकाराप्रमाणे दिसला. अशा ज्योतिस्वरूपास मूर्तरूप काय द्यावे असा प्रश्न सोडविताना शिवलिंगाचा आकार जन्माला आला म्हणूनच त्यातील उभा भाग आपल्या हाताच्या अंगठ्याप्रमाणे दिसतो आणि त्याचा पाया कल्पनाचित्रात उभा केला तर एखाद्या ज्योती समान भासतो. लिंग या शब्दाचा पुरुष किंवा स्त्रीवाचक अर्थ नसून एखादे चिन्ह हाच अर्थ योग्य आहे. हा अर्थ संस्कृतातून जसाच्या तसा घेण्यात आला आहे. मात्र वामपंथियांनी विकृत अर्थ घेतला व पुरुष आणि स्त्रीच्या भोगेन्द्रियाच्या मीलनाचे प्रतीक मानले.

**शिवाच्या प्रतिमेस धोतऱ्याचे फूल वाहतात.**

सर्व देव-देवतांच्या मूर्तीस किंवा प्रतिमेस सुगंधी फूल वाहतात. मात्र विषारी धोतऱ्याचे फूल शिवास अर्पण करतात. आध्यात्मिकदृष्ट्या आपल्या मनातील विकारांचे विष आपण शिवाला अर्पण करतो त्याचे स्थूल रूप धोतऱ्याचे फूल आहे. एक शिवच अशा प्रकारचे विष पचवू शकतो.

**शिवमंदिरात प्रवेश करताना**

शिवमंदिरात प्रवेश करताना नंदी अथवा नंदीगण दाखवितात. आपल्या कथा पुराणात प्रत्येक देव-देवतेस कुठला तरी प्राणी वाहन रूपात दाखविला आहे. जसे देवींचे वाहन वाघ, सिंह किंवा हंस, श्रीगणेशाचे वाहन मूषक त्याप्रमाणे शिवाचे वाहन नंदी दर्शवितात. खरे पाहता निराकार शिव हा स्वयंभू आहे म्हणजे तो सर्वांचा माता-पिता आहे; पण त्याचा कुणी माता-पिता नाही. शिव जन्म-मृत्यूच्या चक्रापासून मुक्त आहे कारण त्याला स्वतःचा देहच नाही. त्यामुळे शिवाला दिव्य अवतरणाद्वारे मानवोद्धार करावा लागतो. ज्या स्थूल मानवी देहाचा आधार घेऊन शिव प्रकट होतात, त्याचे भौतिक रूप म्हणजे नंदीगण शिवमंदिराबाहेर पहायला मिळतो. भारतीय तत्त्वज्ञानानुसार आत्मा हा सारथी किंवा रथी मानला, तर देह हा रथ कल्पिलेला आहे. या न्यायानुसार शिवाचा रथ, त्याच्या मंदिराबाहेर दाखविला जातो.

अनेकदा शिवमंदिरात गर्भगृहात प्रवेश करण्यापूर्वी उंबरठ्याजवळ कासव असते. ज्याप्रमाणे आवश्यकता नसेल तेव्हा कासव आपली कर्मेन्द्रिये आवरून घेते तद्वत शिवासमोर जाताना आपली कर्मेन्द्रियात अडकलेली मन-बुद्धी आवरून घेणे अपेक्षित आहे. साधकाने आपली बाह्यमुखता सोडून अंतर्मुखी होऊन ध्यानमग्न होणे ही खरी साधना आहे.

देवळातील घंटा वाजविण्यामागे अनेक जण म्हणतात, आपण आल्याची देवाला वर्दी देण्याकरिता घंटा वाजवली जाते. काही जण तर म्हणतात, देवाला जागं करण्यासाठी घंटा वाजवतात. देवाला जागे करणे की स्वतः आध्यात्मिकदृष्ट्या जागे होणे गरजेचे आहे? विचार करून पहा.

गर्भगृहात प्रवेश करण्यापूर्वी त्याच्या दरवाज्याची चौकट कमी उंचीची असते. आपल्याला वाकूनच जावे लागते. आपल्या अहंकाराचे मुकुट उतरवून मग गर्भगृहात प्रवेश करावा हीच शिकवण यामागे असावी.

अनेक देवदेवतांच्या मंदिरातील गर्भगृह, बाहेरील सभामंडपाच्या सम पातळीवरच असते. मात्र शिवमंदिरातील गर्भगृह पायऱ्या उतरून खाली जाण्याकरिता निम्न उंचीवर असते. शिव निराकार आहे, त्याचे कार्य गुप्त आहे याचेच ते द्योतक आहे.

शिवलिंगावर दुग्धाभिषेक किंवा जलाभिषेक करतात. शिव हा ज्ञानाचा सागर आहे. त्याच्या शक्ती आणि गुण

(पृष्ठ क्र.१७ वर)

# शिव भोलेबाबांचा शोध

**ब्र.कु. माधव, पाली**

आज इतक्या वर्षांनंतर मागे वळून पाहताना आठवते आमच्या पालीजवळील 'सिद्धेश्वर' गावात प्राचीन शिवमंदिर होते, आजही आहे. छान कोरीव काम केलेल्या काळ्या दगडातले मंदिर आहे. गावच्या इतिहासाचे दाखले पाहिले तर सहाशे-सातशे वर्षे जुने मंदिर आहे असे दिसून येते. मुंबईजवळच्या अंबरनाथ येथील हेमाडपंथी शैलीची आठवण करून देणारे आमचे गावातील मंदिर आहे. छोटेखानी आहे; पण टुमदार आहे. फारशी गर्दी नसताना गेले तर, एक अपूर्व शांतता लाभते. त्या शांततेत मनातल्या कल्लोळाचे निराकरण करण्याची शक्ती आहे, एक सांत्वन घडते, समाधान लाभते. ते शब्दांत मांडणे कठीण आहे त्याचा अनुभव घेणे हाच एक पर्याय आहे. अगदी पहाटे किंवा संध्याकाळच्या सूर्यास्ताच्या वेळी गेले तर फार आनंद मिळतो. त्या देवळाला एक मुख्य प्रवेशद्वार आणि आतील मुख्य भागात चार दरवाजे चारही दिशांना आहेत. आत गेल्यावर थेट समोर मोठे शिवलिंग दिसते. लहानपणी या देवळाविषयी कुतूहल होते. माझ्या आजीसोबत मी जायचो आणि लोकांना पाया पडताना पाहून आपणही तेच करावे हा प्रघात होता; पण काय करतोय ते कळत नव्हते आणि ते वयही नव्हते.

वय लहान असले तरी मनात यायचे, हे काय आहे? आपण श्रीरामाच्या देवळांत जातो तिथे मूर्ती पहायला मिळते तसं इथे का नाही? शिवाला 'भोले बाबा' किंवा 'भोळा सांब' असे का म्हणतात? पुजाऱ्यांना विचारले की ते म्हणत, 'अमुक दिवशी संध्याकाळी कीर्तन आहे किंवा अमुक कथा सांगणार आहेत तेव्हा ये म्हणजे कळेल'. मी त्यानुसार जायचो; पण तितकासा बोध होत नसे. बुद्धीचे समाधान होत नसे; पण अंतरंगात कुठेतरी अनुभवत असलेली शांतता खेचत असे. मोठा झाल्यावर वाचनाची गोडी लागली. अनेक धार्मिक पुस्तके वाचली, अनेक संत, संन्याशांची चरित्रे वाचली. एकीकडे बी.ए.चा अभ्यास केला. पुढे सरकारी नोकरीत रुजू झालो. हे सगळे करत असताना, आचार्य रजनीश, जे.कृष्णमूर्तींच्या व्याख्यानांना जाऊ लागलो. कधी चिन्मय मिशनचे तत्त्वज्ञान मनाला खुणावत असे.

काही गोष्टी पटत असत, काही खटकत असत. मी मनाशी म्हणे, जे चांगले आहे ते घेऊया, बाकीचे यथावकाश समजेल जेव्हा शिवाची कृपा होईल तेव्हा. भक्ती करताना भावविभोरही होत असे. एखाद्याची जयंती आपण साजरी करतो किंवा सत्यनारायणाची कथा ऐकतो; पण ती श्रीनारायणाविषयीची कथा नसून त्या व्रताची कथा असते. तसेच शिवरात्रीविषयीची कथा मिळते पण शिव कसे निर्माण झाले किंवा कुठून आले? शिवाचे आई-वडील कोण? असा प्रश्न विचारला तर उत्तर मिळे 'शिवतत्त्व' अनादि आहे. अनेक प्रश्नांचे काहूर उठे त्यातले मोजकेच देतो.

१. शिवलिंगास ज्योतिर्लिंग असेही म्हणतात. ज्योत आणि शिव याचा काय संबंध आहे? त्रिपुंडाचे पट्टे शिवलिंगावर का काढतात?

२. अन्य देवतांना सुगंधी किंवा आकर्षक फुले अर्पण करतात मात्र शिवास धोतरा, रुई, शमी इत्यादींची फुले अर्पण करतात. धोतऱ्यासारख्या विषारी फुलांचे काय प्रयोजन?

३. त्रिमूर्ती शिव म्हणतात; पण एकच शिवलिंग दिसते. काही ठिकाणी शिव आणि श्रीशंकराचे मुख असेही बघायला मिळते.

४. शिवाची अनेक नावे आहेत जसे, अमरनाथ, केदारनाथ, विश्वनाथ, पापकटेश्वर, आशुतोष इत्यादी. या गुणवाचक नावांचा प्रत्यय कसा येईल?

त्यानंतर एकदा काय झाले, मी कामानिमित्त गावाला गेलो होतो. त्याचदरम्यान शिवरात्र होती. गावात मोठी जत्रा भरते त्या निमित्ताने. म्हटले, माझ्या बालपणीच्या आठवणींना उजाळाही मिळेल म्हणून थांबलो.

शिवरात्रीच्या दिवशी मंदिरात गेलो तर पांढऱ्या कपड्यातील काही भाऊ-बहिणी स्टॅण्डवर चित्रं ठेवून काहीतरी सांगत होत्या. सहजच नजर टाकली आणि

(पृष्ठ क्र.२० वर)

# देव कुठे आहे ?

**ब्र.कु. अश्विनी, मंडणगड**

**'मंदिरात, अंतरात, तोच नांदत आहे. नाना देही नाना रूपी तुझा देव आहे' असे आपण ऐकले आहे. खरेच देव कोठे वसतो? या लेखातील संवाद एक काल्पनिक आहे. वाचकांच्या विचारांना चालना देण्याकरिता रंगविलेला एक संवाद आहे. यातले विचार, एक तर्क जागृत करण्याकरिता मांडले आहेत. कुठल्याही श्रद्धावान व्यक्तीच्या भावनांना धक्का लावण्याचा उद्देश नाही. – संपादक**

विनी आपल्या वडिलांसोबत बाजारातून सामान घेऊन परत येत असताना तिला रस्त्यावर काही टारगट मुले एका कुत्र्याला त्रास देताना दिसली. त्या कृत्यापासून त्यांना परावृत्त करण्यासाठी वडील त्यांना म्हणाले, ''अरे मुलांनो, कुत्र्यातही ईश्वर असतो, त्यामुळे असे पापकर्म करू नका.''

हे ऐकून विनीच्या बालमनात ईश्वर कुठे आणि कोणात असतो? ह्याबद्दल प्रश्न उठायला लागले. थोडं पुढे गेल्यावर तिने वडिलांना विचारले,

**विनी :** बाबा, जर त्या कुत्र्यामधे ईश्वर आहे तर मारणाऱ्या मुलांतही असणार आणि रस्त्यावरील सर्व बघणाऱ्या लोकांतही असेलच की! मग 'एक ईश्वर दुसऱ्या ईश्वराला मारत होता आणि बाकीचे ईश्वर नुसते बघत होते' असं कसं? तिने पुढे विचारले,

**विनी :** ईश्वर कुत्र्यात असेल तर बाकीच्या उपद्रवी प्राण्यांतही असेलच ना? मग जेव्हा डास आपल्याला चावतो आणि आपण त्याला का मारतो ?

विनीच्या वडिलांनी त्या मुलांना ईश्वराची भीती केवळ कुकर्मापासून परावृत्त करण्यासाठी घातली होती. पण विनीचे तर्कशुद्ध मुद्दे त्यांना पटत होते. तिच्या विचारांना दिशा आणि खतपाणी देण्यासाठी ते म्हणाले,

**बाबा:** तुझे म्हणणे अगदी बरोबर आहे. समाजात पापकर्म घडू नये म्हणून 'ईश्वर सर्वव्यापी आहे' हा मुद्दा मांडला गेला असावा.

'सर्वव्यापी' हा नवीन शब्द कानावर पडल्यामुळे विनीने त्याचा अर्थ वडिलांना विचारला.

**विनी :** सर्वव्यापी म्हणजे? एखादी गोष्ट सगळीकडे आहे असेच ना! म्हणजे हवा सगळीकडे आहे तिला सर्वव्यापी म्हणता येईल का? आजी एकदा म्हणाली होती परमात्मा सर्व प्राणीमात्रात, जीव-जंतूत एव्हढेच नव्हे तर, कणाकणात व्यापक आहे असे गीतेत म्हटले आहे. मग त्याला भेटायला आजोबा रोज मंदिरात का जातात आणि प्रार्थना कोणाची करतात?

वडिलांना आपल्या मुलीच्या बुद्धिमत्तेचे कौतुक वाटले, ते तिला म्हणाले,

**बाबा :** आजच्या जगात सगळेच ईश्वराला जाणून घेण्याच्या प्रयत्नात आहेत, भक्तीच्या जाळ्यात गुरफटलेले आहेत. एकीकडे ईश्वराला 'उपरवाला' म्हणून वरती बोट दाखवतात आणि दुसरीकडे अंधश्रद्धेपोटी गुरुंनाच ईश्वर मानून त्यांचीही पूजा करतात! ईश्वर सर्वव्यापक आहे तर त्याचे गुण- पवित्रता, प्रेम, शांती सर्वत्र का दिसत नाहीत? आज समाजात जी विषमता, अन्याय, हिंसा दिसून येते, त्यावरून ईश्वर सर्वव्यापी असेल असं वाटत नाही.

बोलता बोलता दोघेजण घरी पोहोचले होते. आजीने दरवाज्यात उभे राहून त्यांचे संभाषण ऐकले होते. तिनेही बाबांच्या म्हणण्याला दुजोरा देण्यासाठी गीतेमधील एका श्लोकाचा दाखला दिला.

**आजी :** अगं, जर ईश्वर सर्वव्यापी असता तर त्याने **यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत अभ्युत्थानमधर्मस्य तदाऽऽत्मानं सृजाम्यहम्** म्हणजे धर्मग्लानी झाली असतां मी येतो असे देव म्हणतो. म्हणजे तो इथे नाही म्हणून तर येतो असे म्हटले आहे ना! मुळात ईश्वराला सर्वव्यापी असण्याची गरजच काय ? खरं तर ईश्वर सर्व शक्तिमान आहे, सर्वव्यापी नाही.

बाबांचे आणि आजीचे विचार पटल्यामुळे विनीच्या

चेहऱ्यावरचे प्रश्नचिन्ह जाऊन त्याची जागा आता स्मितहास्याने घेतली. परंतु ह्या सर्वशक्तिमान ईश्वराविषयी नीट माहिती कशी आणि कोण सांगू शकेल असा विचार तिच्या मनात सुरु झाला.

काही दिवसांनी विनीच्या शाळेत ब्रह्माकुमारी संस्थेच्या काही बहिणी 'नैतिक मूल्य' विषयावर व्याख्यान देण्यासाठी आल्या. समाजातील नीतिमत्तेचा स्तर सुधारण्यासाठी प्रत्येकजण कसे योगदान करू शकतो, हे त्यांनी खूप सोप्या शब्दांत समजावून सांगितले. भाषणाच्या शेवटी त्या म्हणाल्या की हे सर्व ज्ञान स्वयं ईश्वराने अवतरित होऊन दिले आहे, आणि ह्याविषयी अधिक जाणून घ्यायची उत्सुकता असणाऱ्यांनी ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या सेंटरला आवर्जून भेट द्यावी.

संध्याकाळी घरी आल्यावर विनीने घरच्यांना दिवसभराचा वृत्तांत सांगताना ब्रह्माकुमारीजबद्दल सांगितले आणि सेंटरला भेट देऊन ईश्वराबद्दल अजून जाणून घेण्याची तीव्र उत्कंठाही दर्शवली.

तिची इच्छा पूर्ण करण्यासाठी रविवारी वडील तिला घेऊन ब्रह्माकुमारी सेवाकेंद्रात पोहोचले.

सेवाकेंद्रात मीना दीदींनी अत्यंत प्रेमाने त्यांचे स्वागत केले, दीदींचा ओळखीचा हसतमुख चेहरा पाहून विनीही खूप खुश झाली. विनीचे वडील आपली ओळख दीदींना करून देत म्हणाले,

**बाबा :** ही माझी मुलगी विनी सहावीत शिकत आहे. तुम्ही काही दिवसांपूर्वी तिच्या शाळेत व्याख्यान दिले होते, त्यात तुम्ही ईश्वराच्या अवतरणाबद्दलही बोलला होतात. तुमच्या संस्थेच्या नावातही ईश्वराचा उल्लेख आहे, आम्हालाही ईश्वराच्या बाबतीत अधिक जाणून घेण्यात उत्सुकता आहे.

**दीदी :** तुम्ही अगदी योग्य ठिकाणी आला आहात कारण परमात्म्याचा सत्य परिचय केवळ परमात्माच देऊ शकतो आणि त्याने स्वतः अवतरित होऊन ह्या विश्व विद्यालयाद्वारे स्वतः चा सत्य परिचय देण्याचे कार्य १९३६ पासून सुरु केले आहे.

हे ऐकून विनी आणि तिच्या बाबांच्या मनात अविश्वास मिश्रित कुतूहल दाटून आले.

विनीच्या वडिलांनी लहानपणापासून ईश्वराबद्दल जी काही मते वा विचार ऐकले होते, त्यापेक्षा हे ज्ञान खूपच भिन्न होते. गीतेत पण सांगितले आहे की श्रीकृष्णाचे विराट रूप बघून अर्जुनाचे डोळे दिपून गेले, मात्र इथे सेंटरवर असे काहीच दिसत नव्हते. विनीच्याही मनात अनेक प्रश्न उठले. खरंच, ईश्वर इथे आत्ता असेल का, कसा दिसत असेल तो, त्याचे नाव काय आहे, तो माझ्यासारख्या लहान मुलांशी पण बोलेल का... जणूकाही त्यांच्या मनातले प्रश्न ओळखून दीदी त्यांना म्हणाल्या,

**दीदी :** जगात परमात्म्याबद्दल भिन्न भिन्न संकल्पना आहेत. कोणी त्याला नाम रूप से न्यारा समजतात तर, कोणी त्याला अवतार म्हणजेच भिन्न भिन्न नावा- रूपात पाहतात, कोणी त्याला उपरवाला म्हणतात, कोणी सर्वव्यापी तर कोणी शिवोऽहम म्हणजे मीच परमात्मा आहे असं म्हणतात. आता एक गोष्ट नीट समजून घ्या. आजपर्यंत अनेक संतांनी देवाला सर्वत्र पहिले. तो ठायी ठायी वसतो असा उल्लेख केला. त्यामागे त्यांची देवावरची अपार भक्ती, प्रेम होते. ज्याच्याबद्दल आपल्या हृदयात प्रेम असते त्याला आपण मनः चक्षूने पाहतो आणि म्हणतो मला तोच दिसत असतो डोळ्यासमोर. ह्याचा अर्थ स्थूल नेत्रांपुढे इतर वस्तू असल्या तरी बुद्धीरूपी डोळ्यांनी वेगळी मूर्ती पाहत असतो. तो भाव महत्त्वाचा, तिथे शब्दार्थ न घेता भावार्थ घ्यायचा असतो. उदाहरणार्थ एखाद्याची वाट पाहताना दहा मिनिटे उशीर झाला तरी आपण भेटल्यावर म्हणतो गेला अर्धा पाऊण तास मी इथे खोळंबलोय तुझी वाट पाहण्यात. तिथे भाव महत्त्वाचा असतो तसेच काहीसे. पण जर शब्दार्थ जसाच्या तसा घेतला तर मात्र अनर्थ होतो.

सर्वव्यापी शब्दाच्या चुकीच्या अर्थाने सगळी गडबड केली. समस्त मानवजातीला परमात्म्यापासून विमुख केले आहे. परमात्म्याला सर्वव्यापी मानण्याचा अर्थ हाच होईल की, जगात होत असलेली सर्व हिंसा, अन्याय, दुष्कृत्ये तसेच पापे परमात्माच करीत आहे. पण हे सत्य नाही. देव तर कृपाघन आहे. पतित-पावन आहे. प्राचीन ऋषी मुनींनी पण प्रांजळपणे परमात्म्याविषयी 'नेति, नेति' म्हणून हात टेकले, मग परमात्मा सर्वव्यापी आहे हे कधीपासून मानण्यात येऊ लागले? ही भ्रामक समजूत माणसाच्या कल्पनेची भरारी असून मानवजातीला अत्यंत हानिकारक ठरली आहे. जळीं-स्थळीं, काष्ठी-पाषाणी तो आहे म्हणजे खरोखरीच तो सर्वत्र नाही पण त्याच्याविषयीचा प्रेमभाव सगळ्यांच्या मनांत आहे. अशा अर्थी तो सर्वत्र आहे; पण भौतिक रूपात मात्र नाही.

अजून एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट – देव सर्वत्र आहे असे सांगण्यामागे संत–महात्म्यांचा काय उद्देश असावा? विशेषकरून भारताचा गेल्या एक सहस्र वर्षांचा इतिहास पाहिला तर तो खूप मोठ्या राजकीय उलाढाल्यांचा गेला. विविध राजवटी आल्या गेल्या. त्या काळी नाहक गायींची कत्तल केली जात असे. एखाद्या राजाचे व त्याच्या धर्माचे वर्चस्व सिद्ध करण्यासाठी प्राणी–मात्रांचा उगाचच बळी दिला जाई. देवीच्या देवळात बकरा बळी दिला जाई. किल्ल्यांच्या इतिहासात डोकावले तर दरवर्षी रायगडासारख्या किल्ल्यावर एक रेडा बळी दिला जात असे असे जाणकार सांगतात. अशी निरर्थक प्राणी हत्या टळावी हा देखील एक उदात्त विचार देवाचे सर्वव्यापित्व मानण्यामागे होता. इतका सखोल विचार काळाचा संदर्भ घेऊन कुणी करत नाही. केवळ उथळ विचारांच्या आधारे हा विषय पाहू नये. इतके बोलून दीदींनी एक दीर्घ श्वास घेतला आणि हसल्या. ह्यावर विनीच्या वडिलांनी दीदींना विचारले,

**बाबा :** जर तो सर्वव्यापी नाही, तर मग तो त्रिकालदर्शी आणि त्रिकालज्ञानी का म्हणवला जातो?

**दीदी :** एखादा नाट्य–दिग्दर्शक किंवा लेखक आपल्या नटांच्या नाटकातील भूमिकांविषयी त्यांच्यात व्याप्त नसतानाही सर्वकाही जाणतो, त्याचप्रमाणे परमात्माही सर्वज्ञ असल्यामुळे सृष्टी नाटकातील प्रत्येक गोष्ट जाणतो. तसेच, एखाद्या खोलीत काय आहे हे जाणणाऱ्या माणसाला त्या खोलीएवढा मोठा असण्याची किंवा त्यात व्यापक असण्याची आवश्यकता नसते. तेव्हा, सर्वज्ञाता आणि सर्वव्यापकता यांमध्ये कोणताही संबंध नाही. प्रल्हादाच्या कथेवरून स्पष्ट होते की, परमात्मा इच्छेनुसार उपस्थित होऊ शकतो, तो सदा सर्वदा हजर नसतो.

**बाबा :** जर सर्व मनुष्य आत्म्यांत परमात्मा सर्वव्यापक नसेल तर तो पाप–पुण्याचे फळ कसे ठरवतो?

**दीदी :** सर्व मनुष्य आत्म्यांत परमात्मा सर्वव्यापक असता, तर मुळात पाप अस्तित्वातच आले नसते. वास्तविक सृष्टी नियमांच्या एका स्वयंचलित प्रक्रियेनुसार माणसाला त्याच्या बऱ्या वाईट कर्मांचे फळ आपसूकच मिळत असते. सृष्टी नाटकाचा क्रम नियोजित आहे आणि परमात्मा केवळ ते ज्ञान आपल्या मुलांना देतो.

**बाबा :** कधी कधी आपल्याला अंत:प्रेरणा होते की अमुक कार्य करू नये, हा परमात्म्याचा आवाज नव्हे काय?

हसून दीदी म्हणाल्या : फार छान प्रश्न केलात. जर अंत:प्रेरणा परमात्म्याचा आवाज असेल तर त्याचा अर्थ होतो परमात्मा शरीरात विद्यमान आहे. मग चुकीच्या मार्गाने जाण्याचा विचार कोण बरे करतो? आणि सर्वशक्तिमान परमात्म्याच्या आवाजाकडे दुर्लक्ष करून माणसे दुष्कर्मे का करतात? बहुदा, कलियुगात श्रेष्ठ विचार फार कमी दिसून येत असल्यामुळे, त्यांना परमात्म्याची प्रेरणा म्हटले गेले असावे. आणि जर परमात्मा शरीरात व्यापक आहे तर आत्मा निघून गेल्यावर शरीर निष्प्राण का होते? परमात्मा शरीरात असताना मनुष्याने मुक्तीची इच्छा ठेवणे म्हणजे जणू काही परमात्म्यापासून मुक्तीची आस ठेवणे नाही का?

**बाबा :** मग परमात्म्याला मुक्तिदाता का म्हणतात?

**दीदी :** कारण तो आपल्याला पापकर्मापासून मुक्ती प्राप्त करण्याचे ज्ञान देतो. मार्ग दाखवितो; पण आपल्या कर्मांचा प्रभाव आपल्यालाच नष्ट करायचा आहे. देव काही छू–मंत्र करून मुक्ती देतो असे नव्हे. म्हणूनच म्हणतात ना – गोष्टी सांगेन युक्तीच्या चार.. ईश्वर आपल्याला परमधामात घेऊन जाण्यासाठी आला आहे. जो स्वतः मुक्त असतो तोच इतरांना मुक्त करू शकतो. मनुष्य स्वतःच दुःखदायक सांसारिक बंधनातून मुक्तीची इच्छा करतो, तर परमात्मा स्वतःला बंधनात का म्हणून जखडून घेईल?

ईश्वराच्या सर्वव्यापकतेविषयीच्या शंकांचे निरसन दीदींकडून यथायोग्य रीतीने झाल्यामुळे विनी आणि बाबांचा चेहरा प्रफुल्लित झाला. मीना दीदींनी विनीकडे बघून हसून विचारले,

**दीदी :** एवढं ऐकल्यावर तूच निर्णय कर ईश्वर सर्वव्यापी असू शकतो का? हा विषय गहन आहे. आजच्यापुरती एवढीच चर्चा पुरे. आमच्याकडे एक साप्ताहिक वर्ग चालविला जातो. यात अशा अनेक विषयांवर प्रकाश टाकला जातो. त्याचबरोबर राजयोग म्हणजे ईश्वराची आठवण कशी करायची, त्याच्याशी संबंध कसा जोडायचा याबद्दलही शिकवले जाते. हे सगळे, मोफत दिले जाते. तुम्ही अवश्य रोज पाऊण–एक तास द्या आणि ऐकून मग ठरवा.

वडिलांनी होकार देत नमस्कार केला आणि मनातल्या मनात विचार करत होते विनीला यातले किती कळले असेल? मात्र त्यांच्या मनात हे सगळं अधिक विस्ताराने जाणून घ्यायची उत्सुकता मात्र निर्माण झाली होती.

***

# महाशिवरात्रीची कथा आणि रहस्य

ब्र.कु. हेमंत, शांतिवन, आबूरोड

सृष्टी रंगमंचावर वेळोवेळी देवात्मे, धर्मात्मे, महात्मे व राजनेते जन्म घेतात व लोककल्याण करतात. त्यांचा त्याग, तपस्या-सेवा इत्यादीचे स्मरण करुन, त्यांच्या श्रेष्ठ कर्मांने प्रेरीत होऊन, त्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांचे जन्मोत्सव मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात. श्रीकृष्ण-जन्माष्टमी, राम-नवमी, विवेकानंद-जयंती व महात्मा गांधी-जंयती साजरी केली जाते. ह्याच श्रृंखलेत महाशिवरात्रीचे पुण्यपर्व, शिवभक्त मोठ्या भक्ति-भावाने साजरे करतात, कारण परमात्मा शिव धरतीवर अवतरित होऊन तीन महान कर्तव्ये करतात- १) पतित मानवाला पावन देवता बनवतात, २) तमोप्रधान सृष्टीस सत्त्वप्रधान करतात आणि ३) जीवसृष्टीतील सर्व प्राणीमात्रांचा उद्धारही करतात. ह्या तीन दिव्य अलौकिक कार्यांमुळे महाशिवरात्री विश्वकल्याणकारी शिवपित्याच्या महान कर्तव्याची मोठी खूण ठरते. खरे तर महाशिवरात्रीचे पावन-पर्व सर्वांसाठी शिवअवतरणाचा शुभसंदेश घेऊन येते!

महाशिवरात्री म्हणजे सर्व सणांपेक्षा सर्वश्रेष्ठ आगळे-वेगळे पर्व! अद्भुत परमानंद देणारा महोत्सव होय! भोळ्या भक्तांवर खुश होऊन क्षणभरात सर्वस्व देऊ करणारे त्वरित संतुष्ट होणारे आशुतोष, गुणांचे सागर शिव परमात्म्याचा महिमा आगळा वेगळा आहे. म्हणूनच शिवभक्त उषःकाली शिवमंदिरांमधे लांब-लांब रांगा लावून शिवदर्शनाची वाट पाहतात. भोलेनाथची पूजा-अर्चना-आराधना करुन निर्जल व्रत-उपवास करतात. देवांचेही देव महादेवावर बेलपत्र व धोतऱ्याची फूलं-फळं व जल वाहतात आणि दुग्धाभिषेक करतात. काही ठिकाणी तर बोकडाचा बळीसुद्धा देतात. शिवरात्रीची कथा ऐकून शिवभक्त आख्खी रात्रं जागरण करतात. खरे तर शिवरात्रीचे व्रत, उपवास, कथा व जागरणामागे परमात्म्याचे दिव्य कर्तव्य आणि अलौकिक कर्मांचे अध्यात्मिक रहस्य लपलेले आहे, ते रहस्यं जाणून घेणे सयुक्तिक ठरेल.

महाशिवरात्री विषयी शिवपुराणात एक कथा आहे-एका गावात एक चित्रभानु नावाचा शिकारी होता. तो शिकार करुन कुटुंबाचे पालन-पोषण करीत असे. तो सावकाराचा कर्जदार होता. वेळेवर कर्ज न चुकविल्यामुळे सावकाराने त्याला शिवमठात कैद केले. योगायोगाने त्या दिवशी शिवरात्र होती. शिकाऱ्याने ध्यानमग्न होऊन शिवस्मरण करत चतुर्दशीला शिवरात्रीची कथाही ऐकली. कर्ज दुसऱ्या दिवशी फेडेन असं वचन देऊन शिकारी कैदेतून सुटला व जंगलात शिकारीला गेला. तो तळ्याकाठी बेलाच्या झाडावर चढला. बेल-वृक्षाखाली शिवलिंग होते. शिकारी बेलपत्र तोडून खाली फेकत होता, नकळत ते बेलपत्र शिवलिंगावर पडत होते. दिवसभर उपाशी राहिल्याने त्याचे व्रतही झाले.

एका प्रहरानंतर एक गर्भिणी हरीणी तळ्याकाठी पाणी प्यायला आली. शिकाऱ्याने धनुष्याने तिच्यावर नेम धरला, तेव्हा हरीणी म्हणाली, 'मी गर्भिणी आहे. तू एकाच वेळी दोन जीवांची हत्या करशील ते योग्य नाही. मी पिल्लाला जन्म देऊन परत येईन.' पारध्याने तिला जाऊ दिले. दुसरी हरिणी मीलनोत्सुक होती. तिच्या विनंतीनुसार तिलाही जाऊ दिले. तिसरी आली तेव्हा तिनेही विनंती केली. माझी पाडसे माझ्याविना कशी जगतील? तिलाही जाऊ दिले. काही वेळाने एक धष्टपुष्ट मृग तेथून जात होता. शिकाऱ्याने नेम धरताच मृग दीनवाण्या स्वरात म्हणाला, 'हे पारधी, जर तू माझ्या आधी तीन हरिणींना मारले असेल तर मलाही मार, त्यांच्या वियोगाचे दुःख सहन करावे लागणार नाही. जर त्यांना जीवनदान दिले असेल तर मलाही सोड.' मृगाचे हे बोलणं ऐकून शिकाऱ्याच्या नेत्रापुढे रात्रीचे घटना-चक्र फिरले. त्याने सर्व वृत्तांत मृगाला सांगितला. मग मृग म्हणाला, 'त्या तिन्हीं माझ्या पत्नी होत्या, मी मेल्याने त्या पतीधर्माचे पालन करु शकणार नाहीत. म्हणून मला सोड, मी त्यांना घेऊन परत येईन.' उपवास, रात्रीचे जागरण तसेच शिवलिंगावर बेलपत्र चढविल्याने शिकाऱ्याच्या हिंसक हृदयाचे निर्मल हृदयात परिवर्तन झाले होते. त्याच्या हातातले धनुष्य निसटले. शिवाने त्याच्या हृदयात बदल घडवून आणला. त्याला भूतकाळात केलेल्या पापकर्मांचा

पश्चाताप झाला. थोड्याच वेळात मृग परिवारासह आला. या प्राण्यांमधील सत्यता, सात्विकता व प्रेम भावना पाहून शिकाऱ्याच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. शिकाऱ्याने त्यांना न मारता, मुक्या प्राण्यांची हिंसा न करण्याचा संकल्प केला. त्याने मृग परिवारास जीवनदान दिले. नकळत का होईना, शिवरात्रीचे व्रत केल्याने चित्रभानुला पुढील गती मिळाली. मृत्यूनंतर शिव गण शिकाऱ्यास शिवलोकी घेऊन गेले. शिकाऱ्याची कथा ऐकून असं म्हणावं लागले की महादेव नकळत केलेल्या व्रताचेही फळ देतात. परंतु शिव भोलानाथ तर शिकाऱ्याच्या हृदयात उत्पन्न झालेल्या दयाभावनेनेही प्रसन्न झाले होते. स्वतःच्या कुटुंबाची चिंता असूनही शिकाऱ्याने मृग परिवारास सहानुभूति पोटी जाऊ दिले. वास्तवात शिकारी शिवाचे पूजन करतच नव्हता, तसेच पुजेचे काही फळ मिळावे – अशीही त्याची इच्छा नव्हती. शिकाऱ्याने केवळ दया व सहानुभूतीमुळे मृग कुटुंबास जीवनदान दिले होते – ते शिव पूजनाच्या बरोबर होते. शिवाचा अर्थच कल्याणकारी आहे. तसं पाहिलं तर मूक प्राण्यांचे कल्याण केल्यामुळेच शिकाऱ्याला पुढील गती मिळाली.

शिवरात्रीला रात्रभर जागरण करण्यामागे काय प्रयोजन असावे? परमात्मा शिव हे अशा घोर कलियुगी अज्ञान रात्रीत येतात, जेव्हा मानव स्वतःला व स्वतःच्या पिता परमात्म्याला विसरुन, स्वधर्म व स्वगुण त्यागून, स्वतःस आत्म्या ऐवजी देह समजतो. देहभानामुळे मानव काम, क्रोध, इत्यादी विकारांच्या अधीन होऊन पापकर्म करतो, समाज मूल्यहीन बनतो! मनोविकारांनी त्रस्त झालेला मनुष्य पापकर्म करुन दुःखी होतो. दुःखाच्या बंधनातून मुक्त होण्यासाठी ईश्वराची प्रार्थना करतो, तेव्हा आवश्यकता असते अज्ञान–निद्रिस्त मानवाला जागे करायची, आत्मजागृती करायची. जेणेकरुन मनुष्य स्वतःचे सत्य स्वरुप जाणून, पुन्हा देवपद प्राप्त करेल. कलियुगाच्या अंती व सत्ययुगाच्या आरंभी म्हणजे पुरुषोत्तम संगमयुगात ज्ञानसूर्य शिव उदय होऊन ज्ञानाचा प्रकाश पसरवात व विकाररुपी भूतांना पळवतात. ब्रह्माच्या मुखाद्वारे ज्ञानाचा शंखध्वनी करुन अज्ञान–निद्रेत झोपलेल्या आत्म्यांना जागे करतात. या झोपेतून जागे झाल्याशिवाय ज्ञानाचे अर्जन होऊ शकत नाही व आत्मिक जागृती शिवाय दिव्य गुणांची धारणा होऊ शकत नाही, म्हणूनच परमशिक्षक परमात्मा मानवाला देव बनविण्यासाठी सर्वगुण संपन्न बनण्याचे शिक्षण म्हणजे ज्ञान देतात. या अर्थी ज्ञानाचे श्रवण व अर्जन करणे–हेच आत्म्यांनी केलेले खरे जागरण होय, म्हणूनच शिवभक्त शिवरात्रीला जागरण करतात.

विशेष गोष्ट–शिव हे तर अजन्मा अर्थात् त्यांचा जन्मच होत नाही, तर मग त्यांचा जन्मदिन कसा? हे रहस्य जाणून घेण्यासाठी गरज आहे, परमात्म्याच्या यथार्थ परिचयाची! परमात्म्याचे नाव आहे शिव (शिव म्हणजे कल्याणकारी) व धाम आहे परमधाम! शिवाचे रुप ज्योति बिंदू व ते गुणांचे सिंधू आहेत. साकार सृष्टीवर जो जीव जन्मास येतो, तो मृत्यूही पावतो आणि सृष्टी नाटकाच्या नियमांशी बांधला जातो व आधी सुख, नंतर दुःख अवश्य प्राप्त करतो. जर शिवही जन्म–मृत्यूच्या चक्रात गुरफटले तर मानवास दुःखाच्या सागरातून कोण बाहेर काढेल? जसं झाडाला बांधलेला प्राणी दुसऱ्याला सोडवू शकत नाही, असेच परमात्माही कर्मरुपी दोरीने सृष्टीरुपी वृक्षाला बांधले गेले तर मोह–मायेच्या बंधनापासून कोण सोडवेल? कर्मगतीचे ज्ञानच दुःखाच्या बंधनातून सोडवू शकते आणि ज्ञान देण्यासाठी हवे मुख! परमात्मा प्रजापिता ब्रह्माच्या देहात परकाया प्रवेश करुन, ब्रह्मामुखकमलाद्वारे ज्ञान देऊन स्वधामी परत निघून जातात. परमात्मा शिव तर नारायणाच्या अंतिम नर जन्माच्या शरीररुपी रथात अवतरित होतात, तेच ब्रह्मा व भगीरथ (देहरुपी भाग्यशाली रथ) नावाने प्रसिद्ध होतात. साधारण मनुष्यासारखे परमात्मा मातेच्या गर्भाद्वारे जन्म घेत नाहीत, म्हणून म्हणावेसे वाटते महाशिवरात्री हा परमात्मा शिवाचा दैहिक जन्माचा उत्सव नसून, निराकार परमात्म्याच्या धरतीवरील अवतरणाची खूण आहे.

दुसरी विचार करण्यायोग्य गोष्ट म्हणजे–एखाद्याचा जन्म दिवसात झाला किंवा रात्रीत, त्याचा जन्मदिवसच साजरा करतात, जन्मरात्री नाही! मग शिवाचा जन्मदिवस नव्हे! महारात्री का साजरी केली जाते? शिव १२ तासांचा दिवस किंवा १२ तासांच्या रात्रीत येत नाहीत, ते तर कलियुगाच्या अंताच्या ही अंती, घोर अज्ञान रात्र म्हणजे ब्रह्मदेवाच्या रात्रीत अवतरतात. (सत्य–त्रेता युग हा ब्रह्माचा दिन व द्वापर–कलियुग ब्रह्माची रात्र मानली जाते.) जर रात्रीच्या अंधारात सापाला दोरी समजून, त्यावर चुकून पाय पडला तरी साप चावेलच, त्याचं कारण आहे अंधार. असंच कलियुगी अज्ञानाच्या अंधारात मनुष्य विकाररुपी सापास

सोन्याची साखळी वा दोरी समजून त्यावर कर्मरुपी पाऊल ठेवल्याने विकाररुपी साप त्याला डसतात. ज्ञान सूर्य शिव अज्ञान रात्रीत उदय होऊन ज्ञान प्रकाश पसरवतात दुष्कर्माची ठोकर खाण्यापासून वाचतात. परमात्म्याचे आगमन घोर अज्ञान रात्रीत झाल्याने शिव भोलेनाथाचा जन्मदिवस नव्हे! (महा शिव)रात्री साजरी करतात! शिवरात्रीत काही ठिकाणी शिवावर बोकडाचा बळीही देतात, परंतु हे बरोबर आहे का? शिव तर प्रेम-दया-करुणा-क्षमा इत्यादी गुणांचे सागर आहेत, तर मग स्नेह सागर शिव मुक प्राण्याची हिंसा केल्याने प्रसन्न कसे बरे होतील? मनुष्य कोणतेही कार्य केल्यावर स्वतःचा महिमा करत फिरतो. 'मी हे केलं, ते केलं!' 'मी-मी' केल्याने अहंकार उत्पन्न होतो.. जसं बोकड 'म्यां-म्यां' करतो, असेच मनुष्य 'मी-मी' ची रट लावतो व अहंकाराने आंधळा होतो. श्रेष्ठ कर्मा द्वारे अर्जित केलेले पुण्य नष्ट करतो. मनुष्याचा देवता बनण्यात सर्वात मोठी बाधा ही अहंकारच आहे, म्हणून मीपणाचा बळी हाच खरा अभिप्रेत अर्थ आहे. पण स्वार्थी होऊन 'म्यां-म्यां' करणाऱ्या मूक बोकडालाच बळी देतो.

परमात्मा शिवच कल्पांताच्या समयी येऊन, आत्म्यांना अमरत्वाचे ज्ञान देणारे अमरनाथ, सोमरस (सोम म्हणजे अमृत) वा ज्ञानामृत पाजणारे सोमनाथ आहेत. शिव समस्त विश्वाच्या आत्म्यांचे कल्याण करणारे विश्वनाथ, पापकटेश्वर आहेत. ईश्वर-अल्लाह-गॉड ह्या नावांनी मनुष्य त्यांची प्रेमाने आठवण करतात. चला तर मग, महाशिवरात्रीच्या मंगलमय दिवशी पिता परमात्म्याचा सत्य परिचय जाणून, त्याच्याशी सर्व संबंध जोडूया आणि संपूर्ण सुख-शांती व मुक्ती-जीवनमुक्तीचा जन्म-सिद्ध अधिकार प्राप्त करुया, सर्व आत्मिक बंधू भगिनींना हार्दिक शुभेच्छा...

(नोटः परमात्मा शिवाचा संपूर्ण परिचय प्राप्त करण्यासाठी जवळच्या ब्रह्माकुमारीच्या सेवाकेंद्राशी अवश्य संपर्क करा.)

***

---

(पृष्ठ क्र.७ वरुन)

दक्षिण भारतात माघ महिन्यातील कृ.१३ ही तिथी म्हणजे उत्तर भारतातील फाल्गुन महिन्यात येणारी महाशिवरात्र. तिथीतील हा फारक पंचांगातील कालगणनेच्या पद्धतीमुळे उद्भवतो एवढेच. महाशिवरात्रीच्या वेळी परमात्मा शिव अवतरित झाले अशी समजूत आहे. ही केवळ स्थूल दिवस-रात्रीची कथा आहे, की यात काही विशेष आध्यात्मिक अर्थ आहे? ही रात्र आहे अज्ञानाची रात्र. स्वतःच्या आत्मिक रूपाचा यथार्थ परिचय नसल्यामुळे मनुष्य काम-क्रोध-लोभ-मोह-अहंकार या पाच विकारांच्या प्रभावाखाली कर्म करत आहे. या विकारवश केलेल्या कर्मांमुळे दुःख प्राप्त होत आहे आणि या दुःख चक्रातून बाहेर पडण्याचा मार्ग दिसत नाही. अशा अज्ञानरूपी अंधकारात चाचपडत असलेल्या मनुष्यात्म्यांना सत्य ज्ञानाचा प्रकाश देण्यासाठी परमात्म्याचे दिव्य अवतरण झाले आहे. स्थूल ज्योतिर्लिंगाच्या रूपात ज्याची मनोभावे पूजा केली, त्याच भक्तीचे फलित म्हणून परमात्मा शिव दिव्य ज्ञान आणि सुख, शांती, पवित्रतेचे दान देत आहे. परमात्म्याच्या सत्य स्वरूपाचे स्मरण हाच दुःखमुक्तीचा मार्ग आहे.

(पुनःप्रकाशित)

***

---

(पृष्ठ क्र.१० वरुन)

अक्षय आहेत म्हणूनच सततचा जलाभिषेक केला जातो. इतकेच नव्हे तर शिवमंदिर समुद्राच्या काठी किंवा नदीकाठी, तलावाकाठी वसवल्याचे पहायला मिळते. शिवाची शक्ती, गुण आणि त्याच्या क्षमता सागरासमान अगणित आहेत याचेच द्योतक आहे. उदा. रामेश्वर

शिवमंदिराची स्थापना उंच पर्वतावर केल्याचेही अनेकदा पहायला मिळते. तो सर्वोच्च आहे, सर्वशक्तिमान आहे हे स्थूलरुपाने दर्शविण्यासाठी उंचावरच्या स्थानाची निवड करतात. उदा. अमरनाथ.

सर्व देव-देवतांना पूर्ण प्रदक्षिणा घालून नमस्कार करतात. मात्र शिवमंदिरातील शिवलिंगास पूर्ण परिक्रमा करत नाहीत. त्याच्या पन्हाळीसारख्या भागापर्यंत जाऊन परत फिरतात. आध्यात्मिक दृष्ट्या शिवाने दिलेला आदेश किंवा श्रेष्ठ उपदेशाचे उल्लंघन न करणे अपेक्षित आहे.

भारतीय परंपरेतील सर्वात प्राचीन उपासनेबाबत या गोष्टी जाणून घेण्यात आनंद आहे.

(पूर्व प्रकाशित)

***

# शिवरात्र सर्वात मोठा सण

ब्र.कु. उमेश, सांगली

वर्तमान काळ हा बातम्यांचा आणि प्रसारमाध्यमाचा आहे. आज एवढ्या विपुल प्रमाणात वर्तमान पत्रे प्रकाशित होतात, त्यात अवकाशापासून पाताळापर्यंतच्या सर्व घडामोडींचे वृत्तांत मिळतात. रेडियो, टेलिव्हिजन इत्यादी माध्यमांतून विविध बातम्या वेगाने प्रसारित होऊ शकतात. परंतु त्यात कुठेही परमेश्वराविषयी कुठलीही बातमी नसते. हा काय न्याय आहे?

आज इतकी शक्तिशाली माध्यमे असूनही त्याद्वारे कुठेही परमेश्वराविषयीची माहिती प्राप्त होत नाही. आज Who is who या विषयावर डिरेक्टरी छापली जाते. त्यात जगातील प्रसिद्ध व्यक्तींची नावे झळकतात; पण कुठेही परमपिता परमात्म्याविषयी उल्लेख नसतो. फोन डिरेक्टरीत अग्निशमन दल, पोलीस इत्यादी अत्यावश्यक सेवांची माहिती असते; पण काम-क्रोधादि आग विझवणारा, दुःख-अशांतीपासून रक्षण करणाऱ्या परमात्म्याशी कुठलाही संपर्क करण्याविषयीची माहिती नसते.

यावरुन एक गोष्ट स्पष्ट होते की माहिती प्रसार माध्यमांकडे परमात्म्याविषयी कुठलीही माहिती नाही. पशू-पक्षी-वस्तूंबद्दलच्या माहितीचे भांडार भरलेले आहे. परंतु परमात्म्याविषयी स्पष्ट, निर्विवाद माहिती मिळत नाही. निसर्गातील विषयांवर अनेक जण संशोधन करत आहेत. पण कुणाकडेही परमात्म्याविषयीचे ज्ञान उपलब्ध नाही.

**भारताव्यतिरिक्त इतर देशांच्या अभिप्रायावर विचार**

भारताबाहेरील धर्मांचा विचार केला तर उदाहरणार्थ ख्रिस्ती धर्माचे अनुयायी म्हणतात. येशू ईश्वराचा पुत्र होता. तर ईश्वर म्हणजे कोण? आपले त्या ईश्वराशी काय नाते काय आहे? मुसलमान बांधव म्हणतात खुदाचा पैगंबर म्हणजे मुहम्मदसाहिब. पण खुदा कोण? तो कसा आहे? कुठे आहे? त्याच्याशी आपले अनुसंधान कसे जोडायचे त्याची माहिती मिळत नाही.

**अविनाशी भारतखंडातील सनातन धर्माबाबत विचार**

जेव्हा आपण विचार करतो तेव्हा भारतच सर्वात प्राचीन देश असल्याचे लक्षात येते. येथील सर्व प्राचीन आणि सनातन धर्माकडे सर्वांचे लक्ष जाते. या धर्मातील पवित्र पूज्यस्थानेही अति प्राचीन आहेत. बहुसंख्य लोकांमध्ये परमात्म्यांविषयी ४ गोष्टींमध्ये विशेष एकमत आहे.

१) परमात्मा ज्योतिस्वरूप आहे.

२) परमेश्वर जन्म-मृत्युपासून अलिप्त आहे.

३) परमात्मा सर्वांचा माता-पिता आहे; पण त्याचा कुणी माता-पिता नाही. यावरून निष्कर्ष निघतो की, परमेश्वराचे ना स्त्रीरूप आहे; ना पुरुषरूप. त्यास देहाकार नाही. त्यामुळे त्याची कुणी आई किंवा पत्नीही नाही. कुठलाही लौकिक संबंध पुत्र-कळत्र आणि दारा अशी नाती नाहीत.

४) परमेश्वर परम-पवित्र अर्थात निर्विकारी आहे. ज्ञान, शांती, आनंद वगैरे गुणांचा सागर आहे. दाता आहे. विश्वाचा निर्माता आहे. जगन्नियंता आहे. कल्याणकारी आहे. सदा मुक्ती जीवनमुक्तीचा दाता आहे. देवांचा देव महादेव आहे. त्रिलोकी नाथ आहे.

या चार गोष्टींचा विचार केला तर ब्रह्मा विष्णु शंकर, अंबा, दुर्गा, सरस्वती, श्रीकृष्ण, श्रीराम या कुठल्याही देवतेस वरील मुद्दे लागू होत नाहीत. केवळ एकच तत्त्व मानावे लागते ते म्हणजे निराकार ज्योतिर्लिंग रुप. ते पुरुष किंवा स्त्रीरूप नसून ज्योती स्वरुप आहे. भगवान शिवाची तीच खरी प्रतिमा आहे. समस्त मनुष्यात्म्यांना मुक्ती देणारा मुक्तेश्वर आणि तिन्ही लोकांचा नाथ असणारा त्रिभुवनेश्वर आणि तो कालातीत असल्याकारणाने 'महाकालेश्वर' देखील म्हणतात. शिवाचे रूप बिंदूस्वरूप असल्याकारणाने 'निराकार' असेही संबोधले जाते. त्यास माता-पिता ही म्हटले जाते (त्वमेव माता च पिता...) परमेश्वराचे दिव्य नाव 'शिव' आहे. त्यावरून स्पष्ट होते की तो सर्वांचा कल्याणकारी आहे. तोच ब्रह्मा-विष्णू-शंकराचाही रचयिता आहे. अर्थात् देवांचाही देव आहे.

**'ब्रह्मा विष्णू आणि हर त्यासी निर्मी तोचि थोर**
**तो ओळखावा परमेश्वर नाना यत्ने' (दासबोध -६/१/१२)**

पुराणातील काही कथांनुसार श्रीरामांनी देखील रामेश्वर येथे शिवलिंगाची पूजा केली आणि श्रीकृष्णानेही

पूजा केली त्यास गोपेश्वर म्हटले जाते. संशोधकांनी सांगून ठेवले आहे, त्यांच्या (शिवाच्या) प्रतिमेचे सर्वत्र अवशेष आढळतात आणि पूजा केली जाई त्याचे संदर्भ मिळतात. हे एकच सार्वभौम रूप आहे. जे हिंदू-मुस्लीम ख्रिस्ती इ. सर्वांना मान्य असणारे ईश्वराचे रूप आहे.

मनुष्यात्म्याचे देखील ज्योतीस्वरुप आहे, बिन्दुरुप आहे. त्यामुळे मनुष्यात्म्याचा पिता परमात्मा देखील सूक्ष्म ज्योतिस्वरुप आहे. तेच त्याचे मूळ दिव्य रूप आहे.

शिव आणि शंकर एकच मानले गेले आहे ही एक मोठी गल्लत झाली आहे. ज्योतीस्वरूप शिव आणि शंकर ही देहधारी देवता वेगवेगळी आहेत. परंतु चित्रकारांनी पुरुषरूपाचा वापर करून शिव आणि शंकर एकच कल्पिले आहेत. चित्रकारांनी शिवाला पुरुष रूपात मानून त्याच्याविषयी भाव व्यक्त करण्यासाठी कल्पनेचा वापर केला. त्याद्वारे दाखविले की शिव ज्ञानचक्षूधारी आहे. स्वधर्मस्थित आहे. त्रिविध ताप हरणारा ज्ञानगंगा धारण करणारा आहे. भावनेच्या आधारे पुरुषरूपातील देहाकारास तिसरा नेत्र दाखविला. नंदीवर स्वारी दाखविली आहे. हातात त्रिशूळ घेतलेला त्रिविध ताप हरणारा दाखविला आहे. मस्तकावर गंगा दाखविल्याने 'गंगाधर' म्हटले आहे. अशाप्रकारे शिव आणि शंकर एक मानले गेले आहे. परंतु दोघांची नाम-रूप-कर्तव्ये भिन्न आहेत. शिव सर्वोच्च आहे आणि शंकर ही त्याची रचना आहे.

वास्तविक पाहता शिवरात्र म्हणजे परमपिता शिव परमात्म्याचे अवतरणाचे द्योतक आहे. शिव अवतरणाची स्मृती देणारा शुभ उत्सव आहे. विश्वाच्या रचनाकाराच्या अवतरणाचा उत्सव असल्याकारणाने (महाशिवरात्र) सर्वात मोठा उत्सव आहे. सर्वश्रेष्ठ आहे. रात्र शब्द धर्मग्लानी आणि अज्ञान अंधकाराचे सूचक आहे.

जेव्हा अज्ञानरुपी निद्रेत मनुष्यात्मा असतो. बुद्धी तमोगुणाच्या प्रभावाखाली असते. जेव्हा काम-क्रोधादि डाकू मानवाचा सुख शांतीरुपी खजिनाच लुटतात तेव्हा शिवपरमात्मा जगाच्या कल्याणासाठी अवतरित होतात. असा काळच कलियुगाचा अंतिम काळ आहे. अशा वेळेस परमात्मा स्वतः अवतरित होऊन गीता ज्ञान रूपी अमृत आणि योगरूपी प्रकाशाद्वारे मानवमात्रास सत्त्वगुणी बनवितो. याद्वारे सत्ययुगाची सुरुवात होते.

पुराणात वर्णन आढळते. नवीन सृष्टीच्या निर्मितीसाठी ज्योतिर्लिंग शिवाने ब्रह्माची निर्मिती केली आणि त्याद्वारे प्रकट झाले. या घटनेची आठवण म्हणून दरवर्षी महाशिवरात्रीचा सण साजरा केला जातो. कलियुगाचा अंत आणि सत्ययुगाचा आरंभ यातील संगमयुगाचा काळ सध्या सुरू आहे. स्वतःच्या वास्तविक रुपास ओळखू या आणि शिवास देखील जाणून घेऊ या. त्यांच्याकडून आशीर्वाद प्राप्त करू या.

***


**प्रपत्र ४ : अमृतकुंभ द्वैमासिकाविषयीचे निवेदन**

१) प्रकाशन स्थळ : प्रजापिता ब्रह्माकुमारीज् लाईट हाऊस, वागळे इस्टेट, ठाणे (प.) ४००६०४

२) प्रकाशनाचा अवधी - द्वैमासिक

३) मुद्रकाचे नाव - बी. के. गोदावरी
राष्ट्रीयत्व : भारतीय

अ) भारताचे नागरिक आहेत का? होय
मुद्रणस्थळाचा पत्ता : परफेक्ट प्रिंटस्, २२, ज्योती इंडस्ट्रियल इस्टेट, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे (प.) ४००६०१

४) प्रकाशकाचे नाव : बी. के. गोदावरी
राष्ट्रीयत्व : भारतीय

अ) भारताचे नागरिक आहेत का? होय
पत्ता : द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए-१०,
वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पू)-४००६०३

५) संपादकाचे नाव : ब्र. कु. सचिन उपाध्ये
राष्ट्रीयत्व : भारतीय

अ) भारताचे नागरिक आहेत का? होय
पत्ता : १०२, सीताराम भुवन, भास्कर कॉलनी, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२ महाराष्ट्र

६) मालकाचे नाव व पत्ता : प्रजापिता ब्रह्माकुमारीज
ईश्वरीय विश्व विद्यालय, माऊंट आबू (राजस्थान)
मी बी. के. गोदावरी, असे प्रमाणित करते की माझ्या ज्ञानानुसार वरील माहिती सत्य आहे

**(बी. के. गोदावरी)**
**प्रकाशिका, अमृतकुंभ**

# अलौकिक बिल्व वृक्ष

**वैद्या ज्योत्स्ना बऱ्हाटे, ठाणे**

शिवाला वाहिल्या जाणाऱ्या बेलाचे अलौकिक गुण आहेत. (शास्त्रीय नाव: Aegle marmelos, एगल मार्मेलोस; इंग्लिश: Bael, बेल) हा दक्षिण आशिया व आग्नेय आशिया या भूप्रदेशांत आढळणारा एक वृक्ष आहे. फुलांमुळे, फळांमुळे प्रसिद्ध असलेले बरेच वृक्ष आहेत. केवळ पानांसाठी ओळखले जाणारे थोडेच आहेत. बेल हा वृक्ष त्यापैकी एक आहे. त्रिदल असलेला पळस तसा बेलही. बेलाची जन्मभूमी भारत; पण त्याचे शास्त्रीय नाव 'एगिल' या इजिप्तशियन देवतेवरून ठेवले गेले. हा एगल प्रजातीतील एकमेव जातीचा वृक्ष आहे. बेलाचा वृक्ष १८ मीटर उंचीपर्यंत वाढतो. भारताच्या बहुतेक भागाच्या जंगलात बेलाची झाडे नैसर्गिकरित्या वाढतात. आणि शिवपूजेसाठी अत्यावश्यक मानली गेल्यामुळे गावोगाव, देवाळांजवळ, उद्यानांमध्ये वाढवली जातात. याच्या त्रिदलाशिवाय शिवपूजा पूर्णच होत नाही असा विश्वास देशभरात आहे. पानांबरोबरच बेलाची फळेही महत्त्व पावली आहेत. संत्र्याच्या जातीतल्या या झाडाची फळे अतिशय रुचकर व गुणकारी असतात. बेलफळांचा रंग सोनेरी पिवळट हिरवा असतो आणि त्याचा चंदनासारखा सुगंध वनातले वातावरण भारून टाकणारा वाटतो. बेलफळांचा वापर आयुर्वेदिक औषधांमध्ये भरपूर केला जातो, तसेच झाडाची पाने व खोडाचा गाभा याचाही औषधी उपयोग होतो. बेलफळाचा मुरंबा, सरबत, हे आवेवारचे रुचकर औषध, भूक वाढणारे टॉनिक आहे. या गुणवंत झाडाच्या खोडावर खालपासून वरपर्यंत तीक्ष्ण काटे असतात.

**उपयुक्तता :** बेलाचे फळ पोटाच्या विकारावर फार औषधी आहे. भावप्रकाश, सुश्रुत संहिता, भैषज्य रत्नावली आदी आयुर्वेदिक ग्रंथांमध्ये बेलाच्या उपयोगाबाबत माहिती दिलेली आहे. उष्णताहारक, वात, कफ शामक, रेचक, दीपनकारी, हृदयास उपकारक, स्तंभक, शरीरातील मुत्र व शर्करा कमी करणारा अशी बिल्व फळाची ओळख आहे. बेलात साखर कमी करणारा घटक, टॅनिक असिड, उडनशील तेल, टॅनीन तसेच मारशेलीनीस आदी घटक असतात रातांधळेपणा, डोकेदुखी, डोक्यातील उवानाशक, क्षय, बहिरेपणा, हृदयविकार, पोटाचे दुखणे, अजीर्ण, आम्लपित्त, मंदाग्नी, संग्रहणी, रक्तविकार, मधुमेह, जलोदर, त्वचाविकार, वात ज्वर, कमजोरी, अग्निदग्ध, व्रण गलगंड, तृषाविकार, रक्तातीसार, पित्त अतिसार आदी विकारांमध्ये बेल विशेष गुणकारी आहे. गराचा मुरंबा करतात. ही सगळी माहिती भौतिक पातळीवर विचार केल्यास डोळ्यासमोर येते. अध्यात्माच्या दृष्टीने विचार केला तर, उष्मा काढून टाकण्याचा गुणधर्म या फळात आहे. शरीराप्रमाणे आत्म्यातील काम-क्रोधादि विकारांचा उष्मा नाहीसा करणारे ज्ञान शिवपिता देतात म्हणून लाक्षणिक अर्थाने बिल्व फळ, पाने वाहतात. जसे शरीरातील त्याज्य गोष्टींचा निचरा करण्यात बेल मदत करतो तसेच शिव परमात्मा आत्म्यातील त्याज्य दुर्गुणांपासून मुक्तता देतात हाच पूजेतील वस्तू वाहण्याचा खरा अर्थ मनाला पटतो.

***

(पृष्ठ क्र.११ वरुन)

ऐकावेसे वाटले. शिव अवतरण आणि शिवाने दिलेले ज्ञान या शब्दांनी माझे लक्ष वेधून घेतले. ऐकता ऐकता माझा रस वाढला. मग कळले, ब्रह्माकुमारी संस्थेद्वारे ते प्रदर्शन होते. दुसऱ्या दिवशी मी दिलेल्या पत्त्यावर गेलो आणि साप्ताहिक पाठ्यक्रमविषयी बहनजींनी सांगितले. ते ऐकून मी मुंबईला परत आलो. मनात तो विषय घोळत होता. कामानिमित्त सांताक्रुझला जायचो त्यामुळे तिथल्या सेवाकेंद्राचा पत्ता मिळाला होता. तिथे जाऊन ऐकून घेतले सात दिवसांचे सात धडे वा विषय म्हणूयात. माझ्या मनातल्या अनेक प्रश्नांची तिथे उत्तरे मिळाली. समाधानकारक उत्तरे मिळाल्यामुळे, तेव्हापासून मला जमेल तसे मी सेवाकेंद्रावर जातो आणि राजयोगाचा अभ्यास करतो, तिथल्या साधकांशी त्या विषयाबाबत वैचारिक देवघेव करतो. मला त्या सगळ्यात फार आनंद मिळतो. ज्यांना अशा विषयात रस आहे त्यांनी हे ज्ञान ऐकून घेण्यास काहीच हरकत नाही. शिवाविषयी अशी माहिती इतरत्र कुठे मिळणे शक्य नाही हे मात्र खरे.

***